साप्ताहिक
weeklysadhana.com
# साधना
संस्थापक : साने गुरुजी
शनिवार, ४ जानेवारी २०१४ । मूल्य रु.१०

अपमान जिव्हारी लागला, असा एकही प्रसंग मला आठवत
नाही. माझा अपमान दुसरा कोणी करू शकतो,
यावर माझा विश्वास नाही. समोरच्या व्यक्तीच्या वर्तनामुळे
नाराजी, दुःख, उदास वाटले असेल; परंतु अपमानित वाटलेले
नाही किंवा धमकावणीनेही माझ्यावर काही परिणाम
झालेला नाही. नरेंद्रमहाराजांनी जाहीर भाषणात
'दाभोलकरांचे हात-पाय तोडा' अशी चिथावणी दिली आहे.
'दाभोलकर ख्रिश्चन धर्मीयांचे पैसे घेऊन हिंदू धर्म बुडवण्याचे काम करतात',
असे बेताल वक्तव्य काही लोकांनी केले आहे.
शिवसेना-भाजपच्या आमदारांनी विधानसभेच्या प्रांगणात धरणे धरून
'महाराष्ट्र अंनिसवर बंदी घाला व दाभोलकरांना महाराष्ट्रातून हाकलून द्या',
अशी मागणी केली आहे. वृत्तपत्रांनी मला यावर प्रतिक्रिया विचारली तर
माझी प्रतिक्रिया एवढीच होती – 'हे त्यांच्या परमेश्वरा,
त्यांना क्षमा कर. कारण आपण काय बोलत आहोत,
हे त्यांना समजत नाही.' कायदा होण्यासाठी मी
१० दिवस लातूरला उपोषण केले. घडून येईल
असे वाटणारी गोष्ट घडलीच नाही.
अशी कोंडी झाली की- इतरांना प्रश्न पडतो, आता त्यांचे
उपोषण सुटणार कसे? कोणाच्या हस्ते ते सोडावयाचे आणि
त्या वेळी राणाभीमदेवी थाटात कोणते भाषण करावयाचे.



मला सांत्वनाची कशाचीही गरज वाटली नाही.
मी उपोषण सुरू केले होते; मीच ते थांबवले.
बस, एवढेच... कायदा होण्यास १६ वर्षे अकारण लागली.
मला उदास कसे वाटत नाही, असा प्रश्न महाराष्ट्रात अनेक
ठिकाणी मला विचारला जातो. कायदा न झाल्याचे दुःख आहे;
मात्र कायदा झाला तरी त्याच्या मर्यादेची जाणीवही आहे.
त्यामुळे कोणत्याही घटनेने ती जिव्हारी लागणे, त्याचा प्रतिवाद
म्हणून जिंकण्याची असोशी मनात पेटणे असे माझ्याबाबत घडलेले नाही.
माझा स्वभाव त्या प्रकारचा नाही.
मी ज्या कार्यक्षेत्रात आहे, तेथे कामाचा विचार दशकांच्या नव्हे,
शतकांच्या कालावधीत करायचास हवा याची मला जाणीव आहे.

........डॉ. नरेंद्र दाभोलकर ('एक न संपणारा प्रवास' या लेखातून)


इंटरव्ह्यूसाठी आलेल्या सर्वांनाच
कंप्यूटर येत होता.
पण मी सिलेक्ट झालो
फक्त MS-CIT मुळे!
मेलिंग, चॅटिंग, सर्फिंग, फेसबुकिंग करणारे सर्वसाधारण कंप्यूटर यूझर आपण आहोतच. पण कंप्यूटरचे करिअर उपयोगी ज्ञान, दैनंदिन व्यवहारातील उपयोग आणि कंप्यूटरचे 'स्मार्ट आणि सिरीअस यूझर 'व्हायचं असेल तर MS-CIT ला पर्याय नाही.
९० लाख विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स !
MS-CIT करा,
कंप्यूटरचे स्मार्ट यूझर व्हा!
नजीकच्या केंद्रासाठी 9664161616 वर
ad <space> <pincode> असा sms करा.
उदा. ad 411002
अथवा संपर्क : 9326552525
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स

४ जानेवारी २०१४
वर्ष ६६ / अंक : १८

संपादक :
विनोद शिरसाठ

# अनुक्रम

हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी कल्पना कॉम्प-प्रिंट, पुणे ४ येथे छापून, साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ.गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०. येथे प्रकाशित केले.

दूरध्वनी : वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी :
(०२०) २४४५१७२४.
**संपादक :**
(०२०) २४४५१७२४
Email : weeklysadhana@gmail.com
Web : weeklysadhana.com

**वार्षिक वर्गणी :**
व्यक्तीसाठी रु. ५००/-,
संस्थांसाठी रु. ६००/-
साधना मीडिया सेंटर :
(०२०) २४४५९६३५

मुखपृष्ठ :
गिरीश सहस्रबुद्धे

अक्षररचना व मांडणी :
सुरेश माने

मुद्रितशोधन : मिलिंद बोरकर

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

४
संपादकीय
महाराष्ट्र अंनिसला शुभेच्छा!

५
प्रिय नरेंद्र
शैला दाभोलकर

९
कायदा झाला, डॉक्टर...
हमीद दाभोलकर

१२
जादूटोणाविरोधी कायदा : मर्यादांसह स्वागत!
एन. डी. पाटील

१५
जादूटोणाविरोधी कायद्याच्या १२ कलमांची चित्रे
चित्रकार- चंद्रशेखर जोशी



२१
जादूटोणाविरोधी कायदा : वेदनादायी वाटचालीचा अंत
अविनाश पाटील

२६
जादूटोणाविरोधी कायदा : वस्तुस्थिती आणि आक्षेप
मुक्ता दाभोलकर

२९
विजय तेंडुलकर यांना... एका तरुणाचे अनावृत पत्र
विनोद शिरसाठ

संपादकीय

स्थापण्या
समता शांती
ठेवुनी शुद्ध
साधनां
करिती साधना
त्यांना ठेवो
उत्स्फूर्त
साधना

# महाराष्ट्र अंनिसला शुभेच्छा!

साधना साप्ताहिकाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात म्हणजे १ मे १९९८ रोजी साधना साप्ताहिकाच्या संपादकपदावर डॉ.नरेंद्र दाभोलकर यांची नियुक्ती झाली. तेव्हा अनेकांनी असे भाकीत केले होते की, आता साधना साप्ताहिक अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र बनणार! पण त्यानंतर पंधरा वर्षे संपादकपदावर राहिलेल्या डॉ.दाभोलकरांनी अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित एकही वार्तापत्र किंवा लेख साधनात प्रसिद्ध केला नाही. त्यांनी या काळात जवळपास ३०० संपादकीय लेख लिहिले, त्यात अंधश्रद्धा निर्मूलन या विषयाशी संबंधित संपादकीय लेखांची संख्या १५ पेक्षा जास्त नसेल. म्हणजे वर्षातून जेमतेम एक लेख एवढे प्रमाण त्या विषयाला साधनात मिळाले आहे.

साधनाच्या संपादकपदावर येण्यापूर्वी १० वर्षांहून अधिक काळ ते अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम पूर्णवेळ करीत होते आणि अंनिसचे प्रवर्तक अशीच त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला झालेली होती. मात्र साधना व अंनिस यांच्या कामासाठी त्यांनी आपल्या वेळेची व कार्यशैलीची अशा प्रकारे विभागणी केली होती की, दोन्हींचा परस्परांशी थेट संबंध अजिबात येणार नाही. म्हणूनच अंनिसच्या कामासाठी आलेल्या माणसाकडे साधनाचा विषय ते स्वत:हून अजिबात काढत नसत आणि उलटही तितकेच खरे होते. याचा प्रत्यक्षातील परिणाम म्हणजे, साधना व अंनिस पूर्णपणे स्वतंत्र राहूनही परस्परांना त्याचा फायदाच झाला. सर्वांत आश्चर्यकारक व महत्त्वाचा विशेष हा आहे की, साधना हे वैचारिक नियतकालिक आहे आणि अंनिस ही लढाऊ संघटना आहे, त्यामुळे दोहोंच्या कार्यशैलीत करावयाच्या फरकाचे त्यांचे भान कधीच सुटले नाही.

या पार्श्वभूमीवर हा संपूर्ण अंक अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भातील जादूटोणाविरोधी कायद्यावर केला आहे. अर्थात, डॉक्टर हयात असताना हा कायदा झाला असता तरी असा संपूर्ण अंक कायद्यावर काढण्याबाबत आग्रह आम्ही धरला असता आणि त्यांनी तो मान्य केला असता. कारण आता हा कायदा महाराष्ट्र सरकारचा झाला आहे!

सरकारने कायदा केला आहे, त्याची अंमलबजावणी प्रशासनाच्या स्तरावर त्यांच्या गतीने व पद्धतीने होत राहील. पण हे असे क्षेत्र आहे, जिथे राजकीय पक्षांना व प्रशासकीय अधिकाऱ्यांना विशेष ममत्व वाटणार नाही. त्यामुळे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र अंनिसला मोठ्या धडाडीने प्रबोधन, संघर्ष, रचना ही त्रिसूत्री मोहीम चालूच ठेवावी लागेल. त्यासाठी अंनिसच्या पाठीमागे दाभोलकरांचा वारसा तर आहेच, पण त्यांनी अंनिसला प्राप्त करून दिलेली वैचारिक बैठक निर्दोषत्वाच्या जवळ जाणारी आहे. डॉक्टरांची १२ पुस्तके हे संचित तर फारच मूल्यवान आहे, कारण अंनिसच्या चळवळीतून ते जमा झाले आहे. अशा प्रकारची चळवळ भारतात अन्यत्र कुठेही नाही. त्यामुळे भारतातील अन्य कोणत्याही भाषेत या प्रकारची पुस्तके आलेली नाहीत. हे लक्षात घेतले तर महाराष्ट्र अंनिसला करण्यासाठी 'स्काय इज द लिमिट' असेच म्हणावे लागेल.

अंनिसकडे असलेले तळागाळातील प्रामाणिक व तळमळीच्या कार्यकर्त्यांचे बळ पाहिले, तर डॉक्टरांना इतके सिन्सिअर कार्यकर्ते मिळतात तरी कुठून, असा प्रश्न अनेकांकडून विचारला जात असे. तेव्हा त्यांचे उत्तर होते, 'मी मिळवीत काहीच नाही, चांगली माणसं/कार्यकर्ते अंनिसला जोडून घेतात.' हे जोडून घेण्याचे सामर्थ्य आपोआप येत नाही, त्यासाठी बरीच साधना करावी लागते. नवीन वर्षात व नव्या पर्वात प्रवेश करताना अंनिसचे हे सामर्थ्य वृद्धिंगत होत राहो यासाठी आमच्या शुभेच्छा!



संवाद

शैला दाभोलकर

# प्रिय नरेंद्र...

नरेंद्र...

खूप दिवस झाले; मनात एकसारखे विचार येतायत माझ्या. खूप सारे विचार. आत्ता शरीराने तुम्ही नाही आहात आमच्यात, हे मान्य... पण माझ्या दृष्टीने मात्र तुम्ही नेहमी असणारच आहात.

'माणसाचा मेंदू म्हणजे त्याचं असणं', असं मी शिकले आहे. मग मेंदूतलं एखाद्याचं अस्तित्व, त्याचं असणं हे कसं पुसून टाकता येईल...? म्हणून माझ्या दृष्टीने तरी तुम्ही आहातच! आणि आताशा ते माझ्यात हळूहळू प्रोसेससुद्धा व्हायला लागलंय. असो.

बघता-बघता तीन महिने झाले... आपण काही बोललोच नाही आहोत. केवढं तरी होऊन गेलंय यादरम्यान; माहितीये?... या तीन महिन्यांत जे-जे काही घडलं आणि घडतंय आजूबाजूला; ते मी माझ्याच मनाशी पक्कं करतीये अजून. त्या सगळ्यांविषयी तुम्हाला सांगायला लिहितीये हे पत्र...

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामाकडे तुमच्या पश्चात बघताना, एक चळवळ म्हणून तुम्ही सुरू केलेलं काम हे पुढे-पुढे कसं सरकत गेलंय, हे पाहून खूप बरं वाटतंय मला. 'दाभोलकर गेले... आता त्यांच्या चळवळीचं होणार तरी काय?' हे असं खूप लोकांना वाटतंय यादरम्यान. पण तुम्हाला सांगत्ये नरेंद्र, तसं खरंच नाही वाटत मला तरी. आजूबाजूचं वातावरण मला आशादायीच वाटतंय. प्रत्येक जण आपापल्या परीने चळवळीसाठी, तुमच्या विचार-कार्यासाठी काही ना काही करू बघतोय.

आपल्या वंदना शिंदेच पाहा ना! जमेल तसं जमेल त्या समुदायाला अंनिसविषयी, अंनिसच्या अपेक्षित कायद्याविषयी दिवस-दिवसभर अथकपणे (प्रसंगी वस्तीत जाऊन) समजावून सांगणारी ही बाई; वाटेल का कुणाला सदुसष्ट वर्षांची वृद्धा आहे म्हणून?... 'चळवळ ही अशीच पुढे जात असते... कार्यकर्ते असेच तयार होत असतात', हे आपण वाचलं होतं; आज ते पाहायला मिळालं. आज मला वंदनाताईंसारख्या अनेक जणांमध्ये, तुमची चळवळ सतत हलती ठेवून तिला पुढे नेण्यासाठीचा एक प्रत्यक्ष प्रयत्न दिसतोय... ते समर्पण त्यांच्यात पाहायला मिळतंय! मी तर म्हणेन की, मला स्वतःलाही एक नवा जोम यामुळे मिळतोय. खरंच... कुठून येत असेल हे सारं, कुणास ठाऊक!

ही पोलिटिकल विल गांधींसारखी, नेहरूंसारखी निर्भय कधी होणार, हाच मोठा प्रश्न मला वाटतो. खरंच सांगते, पण गांधी आणि नेहरू यांची वैयक्तिक आयुष्यं आणि त्यांच्यातील परस्परांशी असणारं नातं... त्यात मला त्यांचं प्राप्त परिस्थितीला निर्भयतेने सामोरं जाणंच दिसतं नरेंद्र. गांधींच्या मुलासारखे, त्यांच्या घनिष्ठ सेवकासारखे असणारे नेहरू जेव्हा गांधींच्या मनातील रामराज्याला निग्रहाने नाकारतात आणि नव्या भारतासाठी नवी व अधिक सेक्युलर, लिबरल अशी 'वेस्टर्न थॉट'शी सुसंगत भूमिका घेतात; तेव्हा मला ते निर्भय वाटतात. आणि हाच निकष गांधींच्या बाबतीत बरोब्बर उलट दिशेने लावता येतो. गांधींना आपली नव्या भारताकडे बघण्याची भूमिका ठामपणे पटवणारे नेहरू जसे निर्भय... तसेच नेहरूंच्या भूमिकेला शांतपणे (मग भले ती त्यांची स्वतःची भूमिका नसेना का!) संमती देणारे गांधीही तेवढेच निर्भय!

एक मात्र निश्चित; या सगळ्यातून एक निर्भय असा स्वतःचा चेहरा मात्र या चळवळीला नक्कीच मिळाला आहे. मला आठवतं, तुम्ही नेहमीच 'निर्भय बनो.. निर्भय बनो...!' असं म्हणायचात- अगदी गेली जवळपास चाळीस वर्षं! मला ते 'निर्भय बनणं' म्हणजे एक्झॅक्टली काय, त्याची प्रोसेस काय, हे त्या वेळी कळायचं नाही. तुम्हाला आठवत असेल; मी तुम्हाला त्याविषयी नेहमीच विचारायचीसुद्धा. ...तुम्ही तर आपल्या जुन्या स्कूटरच्या स्टेपनीवरचं कव्हरसुद्धा 'निर्भय बनो!' या अक्षरांनी रंगवल्याचं लक्षात आहे माझ्या! ती एवढीशी जागाही 'काही तरी म्हणण्यासाठी' कशी काय वापरावीशी वाटली असेल तुम्हाला? पण हो, आज मला ते सगळं उमगतंय. तुमचं ते तेव्हापासूनचं निर्भयतेने चालत राहणं लक्षात येतंय. नव्याने आणि पुन्हा एकदा.

परवा आम्ही सोनिया गांधींना भेटायला गेलो होतो, तेव्हाची एक आठवण सांगते. त्यांना मी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कायद्यासाठीची आपली कलमपुस्तिका दाखवली. त्या वेळी त्यांची प्रतिक्रिया काय होती, माहितीये?... याच्यात असं काय आहे की, एखाद्याने विरोध करावा हा कायदा व्हायला?- ही होती सोनियांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया! अशीच एक अलीकडच्या दिवसांतली अजून एक बोलकी (पण वेगळ्या बाजूची!) प्रतिक्रिया आठवतीये मला आत्ता. ''तसा विरोध वगैरे असण्याचं ठोस कारण काहीही नाहीये खरं तर. पण करणार काय, 'पोलिटिकल स्ट्रॅटेजी' म्हणून करायला लागतं आम्हालाही काही वेळा असलं.'' अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कायद्याला विरोध असणाऱ्यांपैकी कुणी तरी तोंडावर दिलेली ही प्रतिक्रिया. मला कळलं नाही, हे कसं उत्तर होऊ शकतं त्या प्रश्नाचं?... ही 'पोलिटिकल स्ट्रॅटेजी', 'पोलिटिकल विल' अशी चुकीच्या पद्धतीनेच जर चालायला लागली, तर सकारात्मक सामाजिक बदल व्हायचे तरी कसे? कधीपर्यंत या बदलांनी अडचणींनाच तोंड द्यायचे?...

ही पोलिटिकल विल गांधींसारखी, नेहरूंसारखी निर्भय कधी होणार, हाच मोठा प्रश्न मला वाटतो. खरंच सांगते, पण गांधी आणि नेहरू यांची वैयक्तिक आयुष्यं आणि त्यांच्यातील परस्परांशी असणारं नातं... त्यात मला त्यांचं प्राप्त परिस्थितीला निर्भयतेने सामोरं जाणंच दिसतं नरेंद्र. गांधींच्या मुलासारखे, त्यांच्या घनिष्ठ सेवकासारखे असणारे नेहरू जेव्हा गांधींच्या मनातील रामराज्याला निग्रहाने नाकारतात आणि नव्या भारतासाठी नवी व अधिक सेक्युलर, लिबरल अशी 'वेस्टर्न थॉट'शी सुसंगत भूमिका घेतात; तेव्हा मला ते निर्भय वाटतात. आणि हाच निकष गांधींच्या बाबतीत बरोब्बर उलट दिशेने लावता येतो. गांधींना आपली नव्या भारताकडे बघण्याची भूमिका ठामपणे पटवणारे नेहरू जसे निर्भय... तसेच नेहरूंच्या भूमिकेला शांतपणे (मग भले ती त्यांची स्वतःची भूमिका नसेना का!) संमती देणारे गांधीही तेवढेच निर्भय!

हा समजूतदारपणा आज का नाही दिसत?... आपापसातले मतभेद चर्चेला पुढ्यात ठेवण्याचं, ते निगोशिएट करत सोडवण्याचं असं पारदर्शक नातं आहे कुठे आजच्या व्यवस्थेत?...

आज, गेला केवढा तरी काळ सनातनी प्रवृत्तीच्या व्यक्ती व संस्था धर्माविषयी, तुमच्याविषयी अगदी नाही-नाही ते लिहितायत; परंतु सरकार ढिम्मच. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कृती याचं महत्त्व तर असतंच नेहमी... परंतु ती कुठल्या मानसातून, कुठल्या विखारातून घडते, यावरही खूप काही अवलंबून असतं. सरदार पटेलांचं उदाहरण आठवत असेल ना तुम्हाला? पटेल गोळवलकरगुरुजींना काय म्हणाले होते, त्याविषयी बोलतीये मी. ''गुरुजी, तुमचं सगळं म्हणणं बरोबरच आहे, मान्य. गांधींच्या मरणाला तुम्ही सगळे जण खरे साक्षीनी नसालसुद्धा, हेही मान्य. परंतु म्हणून तुम्ही ती सबंध परिस्थिती निर्माणसुद्धा केली नाही, हे म्हणणं मात्र अमान्य! गांधीहत्या घडावी म्हणून त्यासाठीची अनुकूल परिस्थिती तुम्ही निर्माण केलीत... आणि हेच पहिल्या प्रथम राष्ट्रहिताच्या दृष्टीने वाईट होतं. आणि जो अशी परिस्थिती निर्माण करेल, ही 'कॅन बी स्यूड इन द कोर्ट ऑफ लॉ!' जोपर्यंत हे सिद्ध होत नाही की, तुम्ही 'ते' केलेलं नाही; तोपर्यंत आम्ही तुम्हाला त्यासाठी गृहीत धरू शकतो.'' हे धैर्यपूर्ण वक्तव्य होतं पटेलांचं. आजच्या राजकारण्यांना त्यांच्याकडे ते काही प्रमाणात (मनात) असूनसुद्धा एक्स्प्रेस करता येत नाहीये.

विवेकी विचारांचं नाही का सांगत आपण नेहमीच- 'विचार करा... ते व्हर्बलाईज करा... त्यावर आपोआप कृती होईल मग'- हे अलीकडे दिसत नाहीये होताना. आज काय होतंय? लोक इतिहास वाचत नाहीत, समजून घेत नाहीत... त्यामुळे मनात विचार येणं कमी होत जातं, व्हर्बलाईज होणं थांबत जातं... कृतीपर्यंत ते येणार कधी? खरं म्हणजे, ही निर्भयतेची वाट इतकी सोपी असूनही त्यांना जमत नाहीये ती धुंडाळायला. त्यांनी फक्त ही निर्भयतेची आणि सुधारणांची वाट धरायचा अवकाश की, हजारो लोक (जे बरं-वाईटाच्या धूसर सीमेवर, कुंपणावर उभे आहेत) साथीला येऊन उभे



राहतील. लोकांना हवा आहे बदल. का बरं येत नाहीये ही व्हिजन या व्यवस्था हाकणाऱ्यांना?... मला माहितीये, मी हाच प्रश्न तुम्हाला विचारला असता तर, तुम्ही असेच नेहमीसारखे हसला असता आणि म्हटला असता, ''शैला, अजून ती वेळ आलेली नाहीये हे ठाऊक आहे मला. आणि म्हणूनच मी त्या पायऱ्या हजार वेळा चढत राहणं थांबवणार नाही!''

... पुन्हा एकदा सोनिया गांधींविषयी सांगते मी तुम्हाला. या बाईला भेटण्याचा अनुभव खरोखर चांगल्या अर्थाने वेगळा होता. एका वेगळ्या देशातून भारतात आलेली ही बाई. आपल्या मनात असणाऱ्या एका त्या अर्थाने साध्या माणसाशी (राजीव) तिने केलेलं लग्न... पुढे मग एकेका टप्प्यावर आयुष्यात घडणाऱ्या किती तरी डायनॅमिक बदलांशी तिने स्वतःला जुळवून घेणं, स्वतःला नव्याने घडवणं... हे सगळंच वेगळं वाटतं मला. आम्ही त्यांच्या घरी गेलो, तेव्हा त्यांच्या खोलीत त्या एकट्याच शांत बसलेल्या होत्या. तिथल्या वातावरणातल्या स्वतःच्याच एका शांततेसोबतच (ज्याकडे दुर्लक्ष करता येणं केवळ अशक्य होतं) होता गांधीजींचा एक मोठा फोटो. विचारी मुद्रेतला फोटो!

विवेकाची वाटचाल, ह्युमनेटेरियन कार्य या गोष्टी सोनियांच्या मनात घट्ट असल्या पाहिजेत, हे मला त्यांच्या लहान-सहान कृतींतून वाचता येत होतं. इतर अनेक राजकारण्यांपेक्षा हे सगळं जाणवेल इतपत वेगळं होतं. (आत जातानाच मनात येऊन गेलं होतं माझ्या- मी आज एका चांगल्या व्यक्तीला भेटतेय म्हणून.) आपण पुस्तकं वाचतो, अक्षरं वाचतो; परंतु माणसं वाचणं, भिंती वाचणं, आजूबाजूचं वातावरण वाचणं- हाच तर आपला वैज्ञानिक दृष्टिकोन असतो, हे मी अनुभवलं! सुरुवातीला निरीक्षण, मग त्याच्या नोंदी, मग अनुमान आणि शेवटी त्याची प्रचीती घेऊन ती-ती गोष्ट करणं, हे विवेकाच्या वाटचालीचं एक सूत्र जर म्हणायचं झालं तर; गेल्या काही दिवसांत मला व्यक्ती म्हणून ते सोनियांच्यात दिसल्याचं म्हणेन मी.

...शेवटी मी एवढंच म्हणेन- वीस वर्षं तुम्ही या चळवळीतून सतत एक विचार देत राहिला होतात. त्याच्यासाठी तुम्हाला अखेरीस बलिदानही द्यावं लागलं. ती चळवळ मात्र इथून पुढेही चालूच राहणार आहे. आज जो कायदा होऊ घातलाय, त्याचे परिणामही लवकरच दिसू लागणार आहेत आणि विवेकाचं बळ सतत वाढत राहणार आहे!

या सगळ्या काहीशा चांगल्या चित्राची एक थोडीशी झलक

मला तुम्हाला आज दाखवून द्यायची होती, म्हणून आज हे पत्र लिहायला घेतलं. उद्या कायदा झाल्यानंतर आपली मूव्हमेंट अनेक अर्थांनी एक नवं रूप घेणार आहे. त्या वेळी मी तुम्हाला जास्ती चांगल्या रीतीने रिपोर्ट करेन. आज जे मी केलं, ते माझ्या स्वतःच्या व्हेंटिलेशनसाठी... मोकळं होण्यासाठी!... तुम्ही नेहमीच कमी बोलायचात, ऐकून घ्यायचात किंवा नुसतंच हसायचात... आणि मला तुमचा प्रतिसाद कळायचा. आत्ताही मला तसंच वाटतंय... वाटतंय की, तुम्ही आत्ताही हसून पाहताय आणि तसाच नेहमीसारखा प्रतिसाद देताय मला. आणि या पत्राला...

**ता.क :**

**नरेंद्र... कायदा झाला!**

... कायद्याची चळवळ ही एवढी मोठी असेल, असं मला कधीच वाटलं नव्हतं. किती ना गोष्टी कराव्या लागतात एक कायदा करण्यासाठी!... आज मी ते पाहिलं. माझ्या आयुष्यात मला ते पाहायला मिळालं. त्यामधलं वेगवेगळ्या लोकांचं योगदान, त्यांची मदत, त्यांचे श्रम– हे सगळंच अतिशय महत्त्वाचं आणि मुळीही विसरता न येण्यासारखं. तुम्हाला मी मुंबईच्या रॅलीबद्दल सांगितलं होतं का?... जेव्हा ही रॅली काढायची ठरवली, तेव्हा सगळ्या समविचारी संघटनांनी घेतलेला आपला रोल, त्यांनी केलेली मदत ही सगळ्या लोकांचं लक्ष वेधणारी होती.

...हे सगळे जण पूर्ण महाराष्ट्र फिरले. अगदी गडचिरोलीपासून ते कोकणापर्यंत. सगळे जिल्हे, सगळे तालुके; जसे तुम्ही कव्हर करायचात ना, तसेच यांनीही केले. लोकांपर्यंत जाऊन त्यांना हा कायदा समजावून सांगितला. आणि मग ही मुंबईची रॅली.

या रॅलीनंतरच्या सभेबद्दल सांगते– खरंच बघण्यासारखी होती ती सभा. प्रत्येक जण आपापल्या खर्चाने तिथवर आलेला. आपल्या मनाने आलेला... अन् आपल्या पायानेही!...

हे सगळं घडत असताना ते बघत एन. डी. पाटील शांतपणे एका बाजूला बसले होते. नरेंद्र, मला जाणवत होतं; त्यांनापण त्या वेळी तुमची कुठे तरी आठवण येत असल्याचं. त्यांच्या बाजूलाच बसले असल्यामुळे मला त्यांच्या पापण्यांच्या ओलसर कडा दिसत होत्या... एक केवढा तरी मोठा माणूस हा. एके दिवशी तुमच्यासोबत तुमच्या विचारांची साथ करायचं ठरवतो काय... आणि एका साध्या कार्यकर्त्यासारखं चालणं, जगणं तो करतो काय... याबद्दल मी तरी काय बोलणार? त्यांची एक मोठी जडणघडण मला यामागे दिसत होती.

नागपूरचं सांगते. अधिवेशनाला जाताना सगळ्यांनी आपापली तिकिटं काढली होती, आपापल्या वेळा ठरवल्या होत्या. कुणीच कुणाला सांगत नव्हतं. पण ते एवढ्या शिस्तीने होताना दिसत होतं की, अवचितपणे माझ्या मनात येऊन गेलं– नरेंद्रच हे सगळं सांगतोय की काय!

...दररोज वाटायचं, आज होईल कायदा पास; पण काहीतरी व्हायचं आणि तो अडायचा विधानसभेत. पण झाला एके दिवशी तो विधानसभेत पास. आणि नंतर विधान परिषदेतसुद्धा. मला हा ताजा कलम लिहावासा वाटला; त्याला असणारं एक महत्त्वाचं कारण म्हणजे, मला यादरम्यान झालेला कायद्याच्या विरोधकांच्या भूमिकेतला बदल तुम्हाला सांगायचा होता. हा खूप महत्त्वाचा बदल होता. हा कायदा पास होताना जी माणसं बोलली ना– विशेषतः कायद्याच्या विरोधातली, त्यांच्या विचारांतला बदल जाणवण्याइतपत दिसून येत होता. महत्त्वाचं असं की, हा बदल वैयक्तिक होता. ते सारे जणू निरुत्तर झाले होते. त्यांचं मन आतून हललं होतं. त्यांना ते म्हणत असावं, 'कायदा बरोबर आहे. मी विरोध कसा करू?'...

ही ती वेळ होती, जेव्हा मला इथे विवेकाची चाहूल लागली, नरेंद्र! मनात आलं– समाजाची ती विवेकाची पोकळी भरून निघण्याची वेळ आत्ता हळूहळू आली आहे. ही अशी वेळ पहिल्यांदाच आल्याचं दिसत होतं की, आपल्याला आता कुणीही विरोधक नसणार आहे आणि आपली चळवळ पुढे जाणार आहे. त्याचं पहिलं बीज या वेळी रोवलं जात असल्याचं मला जाणवत होतं! आता शांतपणे ही वाट चालता येईल अशी थोडी खात्री, थोडा निर्भयपणा आता आपल्यात आल्याचं वाटत होतं.

शेवटी, हे पत्र संपवताना 'राज्यसत्ते'विषयीची आपली मागची कधीची तरी एक चर्चा मला आठवली, ती सांगते. तुम्ही म्हणायचात, राज्यसत्ता ही सगळ्यात महत्त्वाची असते... आणि मी मात्र कायम म्हणायचे की, राज्यसत्तेत आपण कधीही काम करायचं नसतं म्हणून. पण या अधिवेशनानंतर माझ्या लक्षात आलं, राज्यसत्ता किती महत्त्वाची असते ते. राज्यसत्तेने नुसतं ठरवलं तरी ते किती तरी गोष्टी करू शकतात! त्यामुळे लोकचळवळीचा भाग म्हणून, या डेमोक्रसीचा भाग म्हणून हे सगळं बघायला मिळालं, यासाठी मी तुमचं कौतुक करीन तितकं थोडंच आहे... आणि ते जन्मभर करत राहीन!...

**शैला**

mob. : 9011314219



संवाद

हमीद दाभोलकर

# कायदा झाला, डॉक्टर...

प्रिय डॉक्टर,

विधान परिषदेचे अध्यक्ष एक-एक वाक्य शांतपणे वाचत होते...

''सन २०१३ चे विधेयक क्रमांक ३४- महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत आणि त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबतचे विधेयक ज्यांना मंजूर असेल त्यांनी होय म्हणावे, मंजूर नसेल त्यांनी नाही म्हणावे... होयचे बहुमत, होयचे बहुमत, होयचे बहुमत!''

तुमची अठरा वर्षांची लढाई फळाला आली डॉक्टर. दि.१९ डिसेंबरला रात्री ९ वाजून ४३ मिनिटांनी विधान परिषदेत जादूटोणाविरोधी विधेयक मंजूर झाले. प्रेक्षकांच्या गॅलरीमध्ये सकाळपासून अस्वस्थेत बसलेले मुक्ता, अविनाश, माधव बावगेसर आणि मी- सगळ्यांना फक्त तुमचीच आठवण येत होती. अभिनंदनाचे फोन व मीडियाचा गराडा... तुमच्याशिवाय हे सगळे खूप अधुरे होते डॉक्टर. मनातले वादळ आतच लपवत आम्ही माध्यमांना सामोरे गेलो. अश्रूंना लपवणे फारच अवघड होते, पण तुमचा भावनांना संयमाने हाताळायचा वसा आम्ही कसोशीने पाळला डॉक्टर.

गेल्या तीन-चार वर्षांमध्ये कायद्याची लढाई अगदी अंतिम टप्प्यात आल्याचे तुमच्या दूरदर्शी नेतृत्वाला दिसत होते. त्यामुळे प्रत्येक अधिवेशनात कायदा मंजूर झाल्याचा तुमचा फोन येईल अशा आशेवर असलेले आम्ही- आज तुम्हालाच अशा पत्राद्वारे हे कळवताना मनात काय काय होत आहे, ते शब्दांत सांगता येत नाही.

१९८९ मध्ये पु.ल.देशपांडे यांनी पहिली सही करून या कायद्यासाठीचा जो लढा सुरू झाला, त्याला पुढच्या वर्षी पंचवीस वर्षे होतील- असे तुम्हीच जुलै महिन्यात म्हणाला होतात. तेव्हा तुमच्या बलिदानानंतर अशा परिस्थितीत हा कायदा संमत होईल, हे कुणाच्या स्वप्नात तरी आले असते का?

कायद्याच्या मंजुरीसाठी काय करायचं बाकी ठेवलं होतं तुम्ही डॉक्टर? धरणे, निवेदने, शिष्टमंडळांच्या भेटी, पत्रव्यवहार ह्या नेहमीच्या गोष्टी तर झाल्याच... पण स्वत:च्या थोबाडीत मारून घेणे, रक्ताने सह्या केलेली निवेदने, कायद्याची काळी पत्रिका, लातूरला केलेले दहा दिवसांचे उपोषण... अशा वेगवेगळ्या आंदोलनांची तुम्ही ह्या लढाईत आयुधे केलीत. सनदशीर मार्गाने विवेकाचे संघटन होऊ शकते व ते समाजाच्या रास्त मागणीसाठी शासनाला कृतिशील व्हायला भाग पाडू शकते, हा विश्वास तुम्ही आम्हाला दिलात; पण प्रत्यक्षात हा विजयाचा क्षण आला, तेव्हाच तुम्ही आमच्यात नाहीत. नरेंद्रमहाराजांपासून शेकडो बाबा-बुवांना निधड्या छातीने सामोरा जाणारा आपला संजय बनसोडे तुमच्या

तुमच्यावर हल्ला करून ही चळवळ संपवता येणार नाही, असा इशारा मारेकऱ्यांना व त्यांच्या सूत्रधारांना आम्ही दिलाय डॉक्टर. कायद्याचा प्रभाव कमी झाल्याची आवई काही जणांनी उठवली तेव्हा लोकशाहीत प्राणपणाने लढून मिळवलेल्या एवढ्या प्रभावी गोष्टीचे मोलदेखील येथील तथाकथित बुद्धिवाद्यांना कळत नाही, याचे वैषम्य वाटले. कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीदेखील ह्याच निर्धाराने आम्ही पाय रोवून उभे राहू याची तुम्हाला नक्कीच खात्री असेल.

आठवणीने लहान मुलासारखा रडला डॉक्टर. मला म्हणाला, 'आज डॉक्टर हवे होते हमीद...' कुणी कुणाचं सांत्वन करायचं हेच कळेनासं झालंय.

एका गोष्टीचा मात्र नक्कीच अभिमान आहे डॉक्टर... तुमच्या हत्येमुळे तुमचा विचार संपेल असे ज्यांना वाटत होते, त्यांना आम्ही सणसणीत उत्तर दिलंय. अविनाशच्या नेतृत्वाखाली आम्ही सगळे पाय रोवून उभे आहोत. अविनाशचं तुम्हाला पूर्वीपासूनच कौतुक! आपलं बॅटन तुम्ही आधीच त्याच्या हातात दिलं होतंत. तुम्ही गेल्यापासूनच्या चार महिन्यांत चार दिवससुद्धा तो घरी गेला नसेल. डॉक्टर, तुमच्याइतकं पायांना चाकं लावून आम्ही कुणीच फिरू शकत नाही, पण गेल्या चार महिन्यांत उभा-आडवा महाराष्ट्र आम्ही सगळ्यांनी मिळून दोनदा पिंजून काढला.

मुख्यमंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनात कायदा करण्याचं जाहीर आश्वासन देऊनसुद्धा आम्ही गप्प बसलो नाही. गेल्या अठरा वर्षांचा आपला अनुभव कुणावर विश्वास ठेवावा असा नाहीच ना डॉक्टर! 'मुख्यमंत्र्यांच्या राजकीय इच्छाशक्तीला अंनिस उभारणार सामाजिक शक्तीची जोड' अशी एक व्यवस्थित लाईन अविनाशने आम्हाला आखून दिली आणि मग तुमच्याच धडाक्यात उभ्या महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांमध्ये आम्ही निर्धार परिषदा घेतल्या. मुंबईत २ डिसेंबरला काढलेल्या मोर्चाने तर तुमच्याही डोळ्यांत पाणी आणलं असतं डॉक्टर. सुशीला मुंडे, नंदू तळाशीलकर आणि मुंबईच्या सगळ्या टीमने अहोरात्र परिश्रम करून ८ ते १० हजार लोकांचा मोर्चा यशस्वी केला. तुमच्यासारखंच काटेकोर नियोजन. महत्त्वाची बाब म्हणजे- राष्ट्र सेवादल, कम्युनिस्ट पक्ष, शेकाप, घर बचाव-घर बनाव आणि वारकऱ्यांचे प्रतिनिधीसुद्धा मोर्चात आले होते. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम व्यापक समाजपरिवर्तनाच्या कामाचा एक भाग आहे, अशी भूमिका मांडून तुम्ही समविचारी लोकांची केलेली जोडणी भविष्याचा किती वेध घेणारी होती ह्याची आम्हाला आता परोपरी जाणीव होते आहे.

एन.डी.पाटीलसर, बाबा आढाव, मेधाताई, पन्नालाल-भाऊ, नानासाहेब ठाकरे, गजानन खातूभाई, पुष्पाताई, गोविंदराव पानसरेसर, दत्ता इस्वलकर, अशोक ढवळे... किती म्हणून नाव सांगू... सगळे जण अंनिसच्या पाठीशी खंबीरपणाने उभे राहिले. सर्व माध्यमांनीदेखील हा विचार पुढे जावा म्हणून कंबर कसली. निखिल वागळे, राजीव खांडेकर, उदय निरगुडकर, सुरेश द्वादशीवार, उत्तम कांबळेसर- हे सगळे जण जणू आपलीच लढाई असल्यासारखे मैदानात उतरले.

वारकऱ्यांच्या नावाने कायद्याला विरोध, हे दु:खद वास्तव तुम्ही गेली दहा वर्षे झेलत आलात; पण तुमच्या बलिदानाने हे चित्र बऱ्याच अंशी बदलले. डॉ. सदानंद मोरे व विठ्ठल पाटील यांच्या पुढाकाराने वारकऱ्यांच्या विरोधाचे समर्थनात रूपांतर करण्यात आपण बऱ्याच अंशी यशस्वी झालो. 'वारीला समता-संगराचे रूप यावे' ह्या तुमच्या इच्छापूर्तीच्या दिशेने एक पाऊल पडले; पण त्यासाठी तुमचे बलिदान द्यावे लागले, ही खंत मनातून जात नाही डॉक्टर.

महाराष्ट्र अंनिसने इंटरनेटच्या माध्यमाचा जास्तीत जास्त फायदा चळवळीच्या प्रसारासाठी करावा, अशी तुमची कायमच इच्छा होती. अतिश व अविनाश (दाभोलकर)ने पॅरिस व कॅलिफोर्नियात बसून दिवस-रात्र झगडून आणि सुगतच्या मदतीने कायदामंजुरीसाठी 'ॲक्ट नाऊ' नावाची 'वेब कॅम्पेन' चालवली. अतिशने तर पुढाकार घेऊन भारत व भारताबाहेरच्या सहाशेच्यावर शास्त्रज्ञांच्या सह्या कायद्याच्या पाठिंब्यासाठी जमवल्या. नितीन वैद्यांच्या मदतीने आपण एक टोल फ्री क्रमांकच मिळवला- कायद्याला पाठिंबा द्यायला आणि पंधरा-वीस दिवसांमध्ये चाळीस हजारांपेक्षा जास्त लोकांनी पाठिंबा नोंदवला कायद्याला. तुम्हाला ऐकून खूप आनंद होईल डॉक्टर, अतिश पॅरिसहून स्वत:ची सगळी कामं सोडून कायद्याच्या मंजुरीच्या मोहिमेत भाग घ्यायला भारतात तीन आठवडे आला आणि सुगत चेन्नईहून दोन आठवड्यांची सुट्टी टाकून आला.

कार्यकर्त्यांमधील तर कुणाकुणाची नावं घ्यायची... मिलिंद, कृष्णा, शहाजी, विनायक, राहुल, प्रशांत, गवांदे मॅडम... एकही आपला कार्यकर्ता असा नाही जो गेल्या चार महिन्यांत स्वस्थचित्ताने झोपला असेल. मिलिंद जोशीने तर कायद्याची एक सचित्र पुस्तिकाच काढली. कायद्याच्या प्रसारासाठी पस्तीस हजार पुस्तिका आपण छापून वाटल्या. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या मंत्र्यांना-आमदारांना आपण भेटलो. 'जादूटोणाविरोधी कायदा : आक्षेप व वस्तुस्थिती' ही तुम्ही लिहिलेली पुस्तिका प्रत्येक आमदारापर्यंत पोहोचवली.

नुसते एवढेच नाही, तर वटहुकूम आल्यानंतर २३ केसेस दाखल झाल्या महाराष्ट्रात. आपल्या धर्मराजने पुढाकार घेऊन नांदेडमध्ये पहिली केस दाखल केली, तीदेखील मुस्लिम बाबाच्या विरोधात. हा कायदा हिंदू धर्माच्या विरोधात आहे, असे म्हणणाऱ्यांना सणसणीत उत्तर मिळाले.

एवढ्यावर आम्ही थांबलो नाही डॉक्टर... नऊ डिसेंबरला अधिवेशन चालू होते, तर सात तारखेपासूनच नागपुरात ठाण मांडून बसलो. दोन टीम केल्या. एक विधिमंडळात जाऊन



कायद्याचा पाठपुरावा करणारी आणि दुसरी पटवर्धन ग्राऊंडवर धरणे धरून बसलेली. विधिमंडळात आतमध्ये घालवलेला एक-एक दिवस ह्या देशातल्या 'फंक्शनल अनार्की'वरती आमचं फार मोठं शिक्षण करून गेला. त्यामुळे सलग अठरा वर्षे तुम्ही काय ऊर्मीने इथे भिडत राहिलात, हे आम्हाला कोडेच वाटत राहील डॉक्टर. कुठलीच गोष्ट नियोजनाप्रमाणे न होणे, तोंडावर एक व पाठीमागे एक बोलणारे असंख्य जण, राष्ट्र सेवादलाचा वारसा सांगून शिवसेनेमधून कायद्याला विरोध करणारे तुमचेच जुने सहकारी, असंख्य वेळा तहकूब होणारे सभागृह, कायद्याचे श्रेय लाटण्यासाठी टपून बसलेले तुमचेच पूर्वाश्रमीचे सहकारी- अशा एक ना अनेक गोष्टी...

शिवसेना व भाजपकडून ह्या वेळी तरी परिपक्व वर्तनाची आमची अपेक्षा होती डॉक्टर; पण त्यांनी वैचारिक प्रतिवाद करण्यापेक्षा वेळकाढूपणा करणे व तुमच्यावर धादांत खोटे आरोप करण्याचा पवित्रा घेतला. अर्थात, सदनामध्येच त्यांचा मुखभंग झाला आणि आपले आरोप मागे घ्यावे लागले त्यांना. प्रबोधनकार ठाकरेंचा वारसा सांगणाऱ्यांचे हे रूप म्हणजे आम्हाला महाराष्ट्रासाठी फारच धोक्याचा इशारा वाटला डॉक्टर. पण मुख्यमंत्री आपल्या शब्दाला जागले. अजितदादा पवार, सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे व संसदीय कामकाजमंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या पुढाकाराने दुसऱ्या आठवड्यात का होईना, कायदा मंजूर झाला.

तुमच्यावर हल्ला करून ही चळवळ संपवता येणार नाही, असा इशारा मारेकऱ्यांना व त्यांच्या सूत्रधारांना आम्ही दिलाय डॉक्टर. कायद्याचा प्रभाव कमी झाल्याची आवई काही जणांनी उठवली तेव्हा लोकशाहीत प्राणपणाने लढून मिळवलेल्या एवढ्या प्रभावी गोष्टीचे मोलदेखील येथील तथाकथित बुद्धिवाद्यांना कळत नाही, याचे वैषम्य वाटले. कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीदेखील ह्याच निर्धाराने आम्ही पाय रोवून उभे राहू याची तुम्हाला नक्कीच खात्री असेल.

तुम्ही असताना आई, मुक्ता-अनिश, मी-मुग्धा... सगळेच तुमचे न बोलणारे कार्यकर्ते होतो; आता अधिक कृतिशील होऊन काम करण्याचा प्रयत्न करतोय. जसे तुमचे कार्यकर्ते तुम्हाला डॉक्टर म्हणतात, तसाच मीदेखील तुम्हाला डॉक्टर म्हणतोय बाबा. तुमच्यातला बाप आणि कार्यकर्ता कधीच वेगळा नव्हता; तर माझ्यातला मुलगा व कार्यकर्ता कसा वेगळा होईल बाबा?

**तुमचा,**
**हमीद**

hamid.dabholkar@gmail.com
mob. : 9823557531



भाष्य

एन. डी. पाटील

# जादूटोणाविरोधी कायदा : मर्यादांसह स्वागत!

'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंध व उच्चाटन अध्यादेश : २०१३' ला महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेने व विधान परिषदेने मान्यता अध्यादेशाचे रूपांतर कायद्यात केले असल्याने भविष्यकाळात अंधश्रद्धा निर्मूलन कार्यास बळ येईल, असा मला विश्वास वाटतो. मी त्याचे स्वागत करतो. पण प्रारंभीच एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, हा कायदा व्हावा म्हणून डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी जीवाचे रान केले, त्याचा मी गेल्या अठरा वर्षांचा साक्षीदार आहे. दुर्दैवी, अज्ञानी लोकांवर होणाऱ्या अमानुष अत्याचाराचा अंत व्हावा म्हणून डॉ.दाभोलकर धडपडत होते. त्यांची ही सामाजिक तळमळ राज्यकर्ते व या कायद्याला विरोध करणाऱ्या प्रतिगामी शक्ती, विरोधी पक्ष यांना कळली नाही. त्यामुळे महाराष्ट्राने पृथ्वीमोलाचा कार्यकर्ता गमावला, याचे शल्य माझ्या मनात आहे.

समाज निष्क्रिय असतो, कधी कधी तो मुर्दाडही असतो. राज्यकर्ते भेकड असतात. राजकीय स्वार्थापलीकडे जाऊन समाजहिताचे कायदे करणे, निर्णय घेणे शक्य असूनही ते घेत नाहीत. अलीकडच्या काळात तर समाजहितवर्धक राजकीय इच्छाशक्तीचा पूर्णत: लोप झाला आहे की काय असे वाटावे, अशी स्थिती आहे. त्यामुळेच डॉ.नरेंद्र दाभोलकरांचा नाहक बळी गेला. आता महाराष्ट्राला महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ.आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वारसा सांगण्याचा नैतिक अधिकार राहिलेला नाही. या हत्येने महाराष्ट्र शरमिंदा झाला असून त्याची नको तितकी नाचक्की झाली आहे. अठरा वर्षांच्या अक्षम्य दिरंगाईमुळे प्रतिगामी शक्तींचे फावले; इतकेच नव्हे, तर त्या चेकाळल्या आहेत. यास शासनाची दिरंगाईच कारणीभूत आहे. हाती संख्याबळ असताना शासनाने केलेली दिरंगाई अक्षम्यच म्हणावी लागेल.

सन १९९५ मध्ये आमदार पी.जी.दस्तूरकर यांनी अंधश्रद्धाविरोधी कायदा करण्याचे अशासकीय विधेयक विधानसभेत मांडले होते व ती मागणी मतविभाजन होऊनही मंजूर झाली होती. सन १९९९ मध्ये पुलोद सरकारच्या किमान समान कार्यक्रमात अंधश्रद्धाविरोधी कायद्याचे आश्वासन देण्यात आले होते. नंतर सन २००५ तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री चंद्रकांत हंडोरे मी, डॉ.दाभोलकर, सचिव असे आम्ही सलग तीन दिवस प्रस्तावित विधेयकावर कलमवार वाचन करून चर्चा करत होतो. काही कलमांचा समावेश नसावा म्हणून मंत्री, सचिव आग्रही असायचे. डॉ.नरेंद्र दाभोलकर इतके संयमी नि समन्वयवादी की–

आज सारा महाराष्ट्र टोकाच्या अंतर्विरोधात जगत आहे आणि त्याने मी केवळ व्यथितच नाही, तर अस्वस्थही आहे. कोवळी पानगळ केवळ मेळघाटामध्ये नाही, तर ती धारावी झोपडपट्टीतही आहे. हे आपले सामाजिक वास्तव आहे. समाजमन अंधश्रद्धामुक्त आणि विवेकी, विज्ञाननिष्ठ बनवायचे; तर उद्याचा शैक्षणिक आकृतिबंध आपणास बदलावाच लागेल. जादूटोणाविरोधी कायदा करायचा नि शाळेतल्या मुलांनी 'देवा, तुझे किती सुंदर आकाश, सुंदर प्रकाश, सूर्य देतो' ही कविता म्हणायची; यातून विसंगतीच नाही का निर्माण होणार?

म्हणायचे, ‘ठीक आहे, तुमचा आग्रह आहे तर मला मान्य.’ मला त्यांच्या या वृत्तीचे आश्चर्य वाटत राहायचे. आज मागे वळून मी विचार करतो तेव्हा लक्षात येते की, कायदा व्हावा या एकाच प्रश्नाबद्दल डॉ.दाभोलकर आग्रही होते; कारण त्यांना समाजमनाची चांगली जाण होती व वर्तमान कायद्यांच्या मर्यादाही ते जाणून होते.

हे विधेयक सार्वमताने मंजूर व्हावे म्हणून विद्यमान शासनाने खूप प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही. शेवटी त्यांना संख्याबळावरच ते मंजूर करावे लागले ही वस्तुस्थिती आहे. अंधश्रद्धा निर्मूलन व विज्ञाननिष्ठेची रुजवण या एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्या, तरी हे नाणे भारतीय समाज-मनाला पटले, तरी अनुकरणाच्या पातळीवर ही कठीण गोष्ट आहे. कारण भारतीय समाजमन पारंपरिक आहे. युरोपमध्ये प्रबोधनकाळानंतर चर्च, पोपचा प्रभाव कमी झाला. तेथील पुरोहितशाहीला ओहोटी लागली ती केवळ प्रबोधनाने नाही, तर मार्टिन ल्यूथर किंगसारख्या तत्कालीन सुधारकाने पोपने दिलेले पापमुक्तीचे परवाने जाळण्याचे धाडस करून धर्मांध समाजास जागे केले म्हणून! डॉ.नरेंद्र दाभोलकरांचे अंधश्रद्धेसंबंधी विचार स्पष्ट असल्याने त्यांनी असेच साहस दाखवले, म्हणून येथील प्रतिगामी शक्तींचे धाबे दणाणले आणि त्यांनी ही भ्याड हत्या केली.

समाजपरिवर्तनात केवळ समाजसुधारणा करणारे प्रतिबद्ध, कटिबद्ध, बांधील असून चालत नाही; राज्यकर्तेही कणखर असावे लागतात. कुठार घालण्यासाठी वैचारिक स्पष्टता व पारदर्शित्व आवश्यक असते. मला याप्रसंगी लॉर्ड बेंटिंगची आठवण होते. सतीप्रथाबंदीचा कायदा त्यांनी केला. प्रतिगामी शक्ती प्रत्येक काळात असतात आणि त्यांचे स्वार्थ, हितसंबंधही प्रत्येक काळात समानच असतात. जनतेस अज्ञानात ठेवून त्यांचे शोषण करणे सुरूच असते. बेंटिंगला कमी विरोध का झाला? पण तो निर्णयकठोर शासक होता. म्हणून आज आपल्या विधवा भगिनी प्रतिकूल स्थितीतही सन्मानाने जगताना आपण पाहतो. या समाजहितविरोधी शक्ती संधी सापडेल तेव्हा डोके वर काढण्याचा प्रयत्न करीत असतात. पंचवीस वर्षांपूर्वी राजस्थानात भंवरीदेवीच्या निमित्ताने सतीप्रथेच्या उदात्तीकरणाचा प्रयत्न झाला. समाज जागा झाला, म्हणून वेळीच त्याला पायबंद बसला.

नुसता कायदा होऊन सामाजिक प्रश्नांचा निरास होत नसतो; कायदा चालवावा लागतो. कायद्याची स्वत:ची अशी गती असते, ती समाजाने द्यावी लागते. नुकत्याच मंजूर झालेल्या जादूटोणाविरोधी कायद्यातील मूळ प्रस्तावित तरतुदी



शिथिल केल्या म्हणून काहीशी नाराजी दिसते; तरी अंनिस या वर्तमान कायद्याचे स्वागतच करते. त्याचे एक कारण आहे- या कायद्यातील अनुसूचीमध्ये साप चावल्यास व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून मंत्र-तंत्र करण्यास विरोध आहे. केवळ एवढ्या छोट्या कलमानेही हजारो व्यक्तींचे प्राण वाचतील; इतके अज्ञान, दारिद्र्य आपल्या आसपास पसरलेले आहे. मी एक गोष्ट तुम्हा सर्वांच्या आवर्जून लक्षात आणू इच्छितो. ती अशी की, नुसता वटहुकूम निघाल्यानंतर महाराष्ट्रात १६ गुन्हे दाखल झाले. नाशिक ४, सांगली ३, ठाणे २ आणि नांदेड, अकोला, बीड, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, अहमदनगर, सोलापूर येथे प्रत्येकी १. वटहुकमापूर्वी असे गुन्हे दाखल झाले नव्हते, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. ही असते कायद्याची लोकजागृती व भय.

मंजूर झालेल्या कायद्याची एक मोठी उणीव आहे. खरे तर ती प्रस्तावित मसुद्यात नव्हती; चर्चेतून ती आली असावी. ती अशी की- अघोरी, अनिष्ट प्रथेला बळी पडलेल्या प्रत्यक्ष व्यक्ती अथवा त्याच्या नातेवाइकांनाच अशा कृत्याविरुद्ध तक्रार, प्रकरण (केस) दाखल करता येईल. पण पूर्वीच्या (जादूटोणा कायदा) स्थितीत आणि आत्ताच्या स्थितीत असा फरक आहे, ज्यामुळे शिक्षेत वाढ होऊ शकेल. मांत्रिक पूर्वी नामानिराळा राहायचा, तो आता कायद्याच्या कक्षेत येईल.

म्हणजे असे कायदे परस्परपूरक होऊन समाज निर्दोष होण्यास साह्यभूत ठरत असल्याने मर्यादांसह त्यांचे स्वागत केले.

कायद्याच्या मर्यादा असतात; पण समाज जसजसा प्रगल्भ होतो, तसतशा कायद्यात सुधारणा होत राहतात. जादूटोणा कायद्यातील विद्यमान त्रुटी कालौघात दूर होतील, कारण समाज नेहमी अन्याय-अत्याचारांविरोधात सक्रिय, जागृत असतो. कायद्याच्या मर्यादेत आज बळीस तक्रार करायचा हक्क आहे; पण अघोरी प्रथा, अनिष्टता यातून अशी एखादी घटना घडली व जागृत समाजाने संघटितपणे दाद मागितली तर शासनकर्ते, पोलीस यांना त्याची दखल घ्यावीच लागेल. शासन नुसते कायद्याने चालत नसते; लोकमताचा रेटा, लोकक्षोभाची दखल शासनास घ्यावीच लागते. जादूटोणाविरोधी कायदा शासनाच्या इच्छाशक्तीतून नाही तर जनमताच्या रेट्यामुळे मंजूर करावा लागला, हे कोण नाकारेल?

आज सारा महाराष्ट्र टोकाच्या अंतर्विरोधात जगत आहे आणि त्याने मी केवळ व्यथितच नाही, तर अस्वस्थही आहे. कोवळी पानगळ केवळ मेळघाटामध्ये नाही, तर ती धारावी झोपडपट्टीतही आहे. हे आपले सामाजिक वास्तव आहे. समाजमन अंधश्रद्धामुक्त आणि विवेकी, विज्ञाननिष्ठ बनवायचे; तर उद्याचा शैक्षणिक आकृतिबंध आपणास बदलावाच लागेल. जादूटोणाविरोधी कायदा करायचा नि शाळेतल्या मुलांनी 'देवा, तुझे किती सुंदर आकाश, सुंदर प्रकाश, सूर्य देतो' ही कविता म्हणायची; यातून विसंगतीच नाही का निर्माण होणार? आमच्या लहानपणी शाळेत सशाची गोष्ट सांगितली जायची. सशाचे कान देवाने ओढले म्हणून लांब झाले, अशा भाकड कथा-कवितांना उद्याच्या अभ्यासक्रमात स्थान असता कामा नये; जेणेकरून समाज दैवाधीन होईल.

या कायद्याने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीपुढे एक आव्हान उभे केले आहे. या कायद्याच्या आधारे जनमत संघटित करून पीडित लोकांसाठी लोकशक्ती उभारण्याची गरज आहे. आगामी वर्ष हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. ते या कायद्याच्या सक्षम व सशक्त अंमलबजावणीचे वर्ष म्हणून आपणास कृतिकार्यक्रम, उपक्रम यांची आखणी करावी लागेल. कायद्याने मिळालेले स्वातंत्र्य हे समाज-सतर्कता आणि संवेदनशीलतेच्या जोरावरच अबाधित राहाते याचा विसर कार्यकर्त्यांना पडता कामा नये.

या कायद्यात कीर्तनकारांना चमत्कार-कथनास सूट देण्यात आली आहे. पण त्यातून काही हशील होईल, असे मला वाटत नाही. पुराणातली वांगी पुराणातच राहतात. पुराणातल्या वांग्यांची भाजीपण होत नसते आणि भरीतही; पण आपण पर्यायी प्रबोधन प्रभावी केले पाहिजे. कायद्याच्या उपजत (बाय डिफॉल्ट) प्रतिबंधाला जनशक्तीची गरज आहे, ती पेलली पाहिजे आणि पुरवायलापण हवी; आपण कमी पडता कामा नये.

सामाजिक सुधारणा, कायदे यांचे एक वास्तव आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ते नेहमी लक्षात आणून देत असायचे. ते म्हणायचे, एक सामाजिक सुधारणा दुसऱ्या सुधारणेस छेद देत असते. ते मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह चालवायचे. तो सुधारणांचा काळ होता. तेव्हा मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांतही महार, मांग, चांभार अशा भेदांचे ताणतणाव निर्माण व्हायचे. तत्कालीन शासक विचार करत होते की, या प्रत्येकाची स्वतंत्र वसतिगृहे चालवलेली बरी. महर्षी शिंदे यांनी त्यास विरोध केला. कारण त्यामुळे शक्तिक्षय होण्याचा तसाच वर्गविभाजनाचा धोका होता. आज सारा मागासवर्गीय समाज एक दिसतो, त्याला महर्षी शिंदे यांची दूरदृष्टी कारणीभूत आहे.

डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी जादूटोणाविरोधी विधेयक तयार केले, ते कुणा एका धर्माच्याविरोधी नाही. खरे तर त्या विधेयकात 'धर्म' शब्दच नाही, हे किती लोक जाणतात? एवढी एक गोष्टही विरोधकांचे पितळ उघडे पाडण्यास पुरेशी आहे. असली विरोधाची भारूडे काळाच्या ओघात वाहून जातात, हा इतिहास आहे!

महर्षी शिंदेंच्या काळात एक-षष्ठांश लोकसंख्या मागासवर्गीयांची होती; त्यांना तुरुंगसदृश सामाजिक प्रथा, अनिष्ट चालीरीतींच्या बंधनात राहावे लागायचे. महर्षी म्हणायचे की, आपण या समाजबांधवांना सामाजिक तुरुंगात डांबून ठेवणार व दुसरीकडे इंग्रजांकडे स्वातंत्र्य मागणार; हे विसंगत नाही का? आजचा पाच-षष्ठांश समाज अंधश्रद्धांच्या बंधनात अडकलेला आहे. त्यांना बंधमुक्त करण्याचे आव्हान आपणासमोर आहे. हे काम कठीण असले, तरी अशक्य नाही. गरज आहे समाजबांधिलकीची व कार्यकर्त्यांच्या निग्रहाची! कायद्याचा स्थायिभाव परिवर्तनीय असतो. अंधश्रद्धा आज रोगासारखी पसरत आहे, रोगापेक्षा प्रभावी अशा प्रबोधनानेच मुकाबला शक्य आहे.

(शब्दांकन : सुनीलकुमार लवटे)

**प्रा. एन. डी. पाटील**

अध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती



कलम : १

भूत-भानामतीवरील विश्वासातून बळजबरीने अघोरी उपाय योजणे.



कलम : २

तथाकथित चमत्कारातून आर्थिक प्राप्ती करणे,
फसवणूक करणे वा दहशत पसरविणे



**कलम : ३**

अलौकिक शक्तीच्या हव्यासापोटी अघोरी प्रथांचा
अवलंब करणे वा त्याचे उदात्तीकरण करणे



**कलम : ४**

करणी, भानामती, जादूटोणा यांची भीती दाखवून
अमानुष कृत्य करणे वा नरबळी देणे



**कलम : ५**

अतींद्रिय शक्तीचा शरीरात संचार झाल्याचा दावा करून भीती दाखवणे, धमकी देणे वा फसवणूक करणे



**कलम : ६**

विशिष्ट व्यक्तीवर करणी, जादूटोण्याचा आरोप करून वा त्याला/तिला सैतान ठरवून त्याचे/तिचे जगणे मुश्किल करणे

**कलम : ७**



चेटूक केल्याचा आरोप करून नग्नावस्थेत धिंड काढणे, मारहाण करणे वा समाजातून बहिष्कृत करणे

**कलम : ८**



मंत्र-तंत्राद्वारे भूत-पिशाचांना आवाहन केल्याचा आभास निर्माण करून घबराट पसरवणे वा अघोरी कृत्य करण्यास भाग पाडणे



**कलम : ९**

साप, विंचू चावल्यास वैद्यकीय उपचारांपासून परावृत्त करून
मंत्र-तंत्र, गंडे-दोरे यांचा अवलंब करणे



**कलम : १०**

रक्तविरहित शस्त्रक्रियेचा आभास निर्माण करून लिंगबदलाचा
वा इतर उपचारांचा दावा करणे



**कलम : ११**

अलौकिक शक्तीच्या आभासातून पुत्रप्राप्तीचे आमिष दाखविणे, अवतारी व्यक्ती, पवित्र आत्मा वा पुनर्जन्म असा आभास निर्माण करून लैंगिक शोषण करणे



**कलम : १२**

मानसिक विकलांग व्यक्तीला अलौकिकता बहाल करून फसवणूक करणे



दृष्टिक्षेप

अविनाश पाटील

# जादूटोणाविरोधी कायदा : वेदनादायी वाटचालीचा अंत

नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा, भोंदू लोकांकडून केले जाणारे जादूटोण्याचे व भूत-पिशाचाचे प्रयोग यामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण होण्याच्या घटना उघडकीस येत असून हे प्रमाण अत्यंत भयावह आहे. अशा प्रकारे अंधश्रद्धा, जादूटोणा आणि दुष्ट प्रथांपासून सर्वथा व सर्वस्वी नव्हे तर काही थोड्या प्रमाणात संरक्षण करणारा हा कायदा. या कायद्याचे जनक डॉ.नरेंद्र दाभोलकर आणि अंनिस अविश्रांत परंतु निराश न होता सर्व शक्तिनिशी गेले पावशतक वाटचाल करीत राहिले आणि डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी त्यासाठी हौतात्म्य पत्करल्यावरच या कायद्याचा दुःखद वातावरणात जन्म झाला. एखाद्याचा जन्म होण्यासाठी पावशतक प्रसूतिवेदना भोगण्याचे आणि त्याच्या जन्माच्या वेळीच मातेचे बलिदान झाल्याचे जगाच्या इतिहासात दुसरे उदाहरण नसेल.

'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अध्यादेश', अशा लांबलचक नावाने हा अध्यादेश काढण्यासाठी डॉ.नरेंद्र दाभोलकर या विद्वान, सुसंस्कृत व मृदु स्वभावी सामाजिक कार्यकर्त्यास शेवटी आपल्या प्राणांचे बलिदान द्यावे लागले आणि नंतरच शासनाला हा अध्यादेश लागू करण्याची सुबुद्धी झाली.

वास्तविक अंधश्रद्धा निर्मूलन कायदा, जादूटोणाविरोधी कायदा किंवा दुष्ट प्रथा, जादूटोणा आणि अघोरी विद्या प्रतिबंधक कायदा अशा विविध नावांनी यापूर्वी वर्णन केल्या गेलेल्या आणि शेवटी वर सांगितल्याप्रमाणे लांबलचक नावाने निघालेल्या या कायद्याची गर्भधारणा सन १९९० ला झाली. जानेवारीमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे पुणे येथे अंधश्रद्धा निर्मूलन जाहीरनामा राज्यव्यापी परिषद घेतली होती. त्या परिषदेत अंधश्रद्धा निर्मूलनाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्याच्यावर पहिली सही पु.ल. देशपांडेंनी केली होती. त्याच ठिकाणी सुरुवातीला ओळखला जाणारा अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करण्याची मागणी प्रथमच करण्यात आली. त्याचा मसुदाही तयार करण्यात आला आणि तत्कालीन मुख्यमंत्री ना.शरद पवार यांचेकडे तो मसुदा देऊन कायदा करण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु मुख्यमंत्री ना.शरद पवार यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकिर्दीत त्या मसुद्याचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून काहीही प्रयत्न करण्यात आले नव्हते.

युतीचे सरकार १९९५ ला सत्तेवर होते. त्या वेळी नांदेडचे आमदार पी.जी.दस्तुरकर यांनी ७ जुलै १९९५ रोजी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याबाबतचा अशासकीय ठराव विधान परिषदेत मांडला. त्या वेळी तो ठराव मतदानाद्वारे मंजूरही झाला होता. अशा रीतीने अशासकीय ठराव मंजूर झाल्यास त्याचे प्रारूप शासनाने अधिकृत शासकीय ठराव म्हणून सभागृहापुढे मंजुरीसाठी ठेवण्याची परंपरा किंवा संकेत आहेत, परंतु युती सरकारनेही या संकेताचे पालन केले नाही.

महाराष्ट्रात लोकशाही आघाडीची सत्ता १९९९ ला आली. त्या वेळी आघाडीतील पक्षांनी राज्यकारभार करण्यासाठी किमान समान कार्यक्रम समिती निर्माण केली. प्रा.एन.डी.पाटील त्या समितीचे अध्यक्ष होते. या समितीने जो किमान समान कार्यक्रम तयार केला होता, त्यात आघाडीतल्या सर्वपक्षीय सदस्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन कायदा मंजूर करण्याचे धोरण किंवा

निर्णय समाविष्ट केला होता; परंतु त्याही वेळी हा कायदा सभागृहापुढे मंजुरीसाठी आला नाही.

दि. ४ ऑगस्ट २००३ रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली होती आणि त्या बैठकीत मंत्रिमंडळाने या कायद्याला नवे नाव देऊन तो मंजूर केला. अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याऐवजी या कायद्याला 'जादूटोणा-विरोधी कायदा' असे नाव देण्याचा निर्णय झाला, परंतु लोकशाही आघाडी सत्तेच्या कारकिर्दीत हा कायदा विधानमंडळापुढे मंजुरीसाठी आलाच नाही.

नंतर १३ एप्रिल २००५ रोजी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सामाजिक न्यायमंत्री ना.चंद्रकांत हंडोरे हे या कायद्याचे विधेयक मांडण्यासाठी उभे राहिले; परंतु त्यांना सत्तारूढ पक्षाच्या आमदारांनीच विरोध केला, त्यामुळे विधेयक मांडता आले नाही.

जुलै २००५ मध्ये मुख्यमंत्र्याच्या पुढाकाराने ना.आर.आर.पाटील, विरोधी पक्षनेते रामदास कदम, गोपीनाथ मुंडे आणि हिंदू जनजागरण समितीचे प्रतिनिधी यांची बैठक झाली. कायद्यावरील आक्षेपांबाबत सविस्तर व खोलवर चर्चा झाली. आक्षेपांचे निराकरण करण्यात आले आणि कायद्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी विधानसभेत ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान मुख्यमंत्र्यांकडे निवेदने, बैठका, पत्रव्यवहार आणि त्यांच्याकडून आश्वासन, परत निराशा, परत पत्रव्यवहार, अर्ज-विनंत्या असे करत-करत एप्रिलमध्ये या कायद्यावर विधान परिषदेत चर्चा झाली आणि हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्याचा निर्णय झाला. परत या कायद्यावर आक्षेप घेण्यात आला. कायद्याला विरोध करणारे आणि त्याच्या समर्थनार्थ शेकडोंनी निवेदने किंवा हरकती आपापल्या संघटनेमार्फत किंवा व्यक्तिश: शासनाकडे पाठविण्यात आल्या. आजपर्यंत स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात या कायद्यासंबंधी जेवढी निवेदने व हरकती आल्या तितक्या हरकती कोणत्याही कायद्यासंबंधी यापूर्वी शासनाकडे दाखल झालेल्या नव्हत्या. या कायद्याला विरोध करणारी ३८,००० पोस्टकार्डे संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आली होती. तर ७८,००० पोस्टकार्डे कायद्याच्या समर्थनार्थ पाठविण्यात आली होती.

महाराष्ट्राच्या सार्वत्रिक निवडणुका २००९ मध्ये झाल्यामुळे व संयुक्त चिकित्सा समितीने निर्णय न घेतल्यामुळे विधानसभेत मंजूर झालेला हा कायदा बारगळला आणि ती संयुक्त चिकित्सा समिती विसर्जित पावली.

परत 'ये रे माझ्या मागल्या' सुरू झाले. परत निवेदने, आंदोलने, विरोध, आग्रह, पत्रव्यवहार व विनंत्या आणि शेवटी एप्रिल २०११ मध्ये मंत्रिमंडळाने मुख्यमंत्री ना.पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा कायदा विधानसभेत मांडण्यास मंजुरी दिली. जुलै २०११ मध्ये झालेल्या विधानसभेच्या अधिवेशनात या कायद्याच्या मंजुरीसाठीचा प्रस्ताव मांडण्यात आला, परंतु त्यानंतर एप्रिल २०१३ पावेतो या कायद्यावर विधिमंडळात कोणतीही चर्चा झाली नाही. दरम्यान, काही वारकरी बांधवांनी या कायद्याला आक्षेप घेतले. वारकरी बांधवांच्या प्रतिनिधींबरोबर मुख्यमंत्री, ना.पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, गृहमंत्री ना.आर.आर. पाटील, सामाजिक न्यायमंत्री ना.शिवाजीराव मोघे यांच्या बैठका झाल्या. शेवटी डिसेंबर २०१२ मध्ये वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी आणि मुख्यमंत्री ना.पृथ्वीराज चव्हाण यांच्यात बैठक झाली आणि वारकरी बांधवांच्या आक्षेपांवर सविस्तर चर्चा करून मुख्यमंत्र्यांनी या कायद्यात लहान-मोठे बदल करण्याचे मान्य केले व या कायद्याला अंतिम स्वरूप प्राप्त झाले. त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान महाराष्ट्र अंनिसतर्फे मुंबईला आझाद मैदानावर राज्यव्यापी जेल भरो आंदोलन करण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधेयक मांडायचे आश्वासन पूर्ण केले नाही. शेवटी १७ एप्रिल २०१३ रोजी सुधारित मसुदा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने पुन्हा एकदा मंजूर केला.

दि. २० ऑगस्ट २०१३ रोजी म्हणजे डॉ.नरेंद्र दाभोलकर यांची पुण्यामध्ये भर दिवसा निर्घृण हत्या झाल्यानंतर २२ ऑगस्ट रोजी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने जादूटोणाविरोधी कायद्याच्या वटहुकूमाला मंजुरी दिली. दि. २४ ऑगस्टला महाराष्ट्राच्या राज्यपालांनी वटहुकूमावर मंजुरीची सही केली आणि महाराष्ट्र सरकारच्या राजपत्रात २६ ऑगस्ट २०१३ रोजी तो तातडीने प्रसिद्ध करण्यात आला. तो वटहुकूम तत्काळ अमलात आला असून, पोलिसांनी त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत २४ गुन्हे दाखल झाले आहेत.

सुरुवातीचा अंधश्रद्धा निर्मूलन आणि आताचा जादूटोणाविरोधी आणि अनिष्ट व अघोरी प्रथांविरुद्धच्या या कायद्याचा प्रवास गेली २३ वर्षे किंवा जवळपास पावशतक अव्याहतपणे चालत आला आहे. दरम्यानच्या प्रदीर्घ कालावधीत या कायद्याच्या नावात, प्रस्तावित मूळ तरतुदींमध्ये आणि जोडलेल्या परिशिष्टांमध्ये विरोधकांनी

## विज्ञान निर्भयता नीती

घेतलेले आक्षेप व हरकती मान्य करून अनेक वेळा बदल करण्यात आले.

या कायद्याचा जाहीरनामा पुण्याला १९९० मध्ये जरी प्रसिद्ध करण्यात आला होता, तरी त्याचे पहिले प्रारूप किंवा विधेयक २००३-०४ मध्ये तयार करण्यात आले. या वेळी या कायद्याला 'महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट, अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन करणारा अधिनियम २००४', असे नाव देण्यात आले होते. या विधेयकात एकंदर १४ तरतुदी होत्या आणि त्याला जोडलेल्या परिशिष्टात एकंदर २७ अनिष्ट, दुष्ट अतींद्रिय व अघोरी प्रथांचा समावेश करण्यात आला होता. परंतु हे विधेयक विधिमंडळापुढे मांडले गेले नाही आणि त्याचा कायदा झाला नाही. आताच्या विधेयकात ज्या अमानुष, अनिष्ट आणि अघोरी प्रथांचा समावेश करण्यात आला होता, त्याव्यतिरिक्त इतर प्रथांचाही समावेश होता. त्या खाली दिल्या आहेत.

१. देवाच्या व श्रद्धेच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणे, स्त्रियांशी किंवा पुरुषाशी संबंधित व्यक्तीच्या संमतीने अथवा संमतीशिवाय, एक तर नैसर्गिक किंवा अनैसर्गिक, निषिद्ध लैंगिक संबंध ठेवणे.

२. कोणत्याही व्यक्तीच्या माध्यमातून देवाचा किंवा देवीचा संचार करविणे किंवा संचार केल्याचा प्रचार करणे.

३. एखाद्याला लागलेले वेड हे भूत किंवा दैवी शक्तीच्या प्रभावामुळे लागल्याचा समज करून देणे आणि त्याला बरे करण्यासाठी कोंबडी किंवा बकरा अशा अन्य प्राण्यांचा बळी देऊन मंत्र-तंत्र पार पाडणे.

४. कोणत्याही स्त्रीला मुलगा होण्याचे आश्वासन देऊन त्यासाठी तिच्या गर्भारपणाच्या चौथ्या महिन्यात गोपाल संतान हा विधी पार पाडणे.

५. वेड खरे करण्याची, गंभीर किंवा विकोपाचा आजार असलेल्या रुग्णावर उपचार करण्याची खोटी आशा दाखवून मंतरलेले खडे, अंगठी, बांगडी, जादूची कांडी किंवा धागा, ताईत, गंडा-दोरा इत्यादी देऊ करून लोकांना मोठ्या आशेपायी फसविणे.

६. आधुनिक विज्ञानाच्या साह्याने सिद्ध करता येऊ शकणार नाही, अशा चेटुकाचा प्रयोग करून एखाद्या व्यक्तीस भुताने झपाटणे.

७. त्या वेळी अमलात असलेल्या कायद्याखाली अधिकृत किंवा मान्यताप्राप्त वैद्यकीय पदवी नसताना, मंत्र-तंत्राच्या साह्याने कोणत्याही रोगावर उपचार करणे.

८. भानामतीच्या प्रभावाने वस्तू जळणे, अदृश्य होणे, शरीरावर फुलीची खूण दिसणे इत्यादी... यांसारख्या गोष्टींवर विश्वास ठेवण्यास भाग पाडणे व त्यावर उपाय करण्याचा दावा करणे.

९. स्वतःला जमिनीत पुरून घेऊन चमत्कार केल्याचा दावा करणे.

१०. स्वतःला दैवी शक्ती असलेला अवलिया बाबा अथवा बाबा समजून, सार्वजनिक ठिकाणी नग्नावस्थेत वावरणे आणि स्त्रियांशी असभ्य वर्तन करणे.

११. देवाची कृपा मिळवून देण्याच्या बहाण्याने, बेकायदेशीर मार्गांनी धन किंवा इतर चीजवस्तू स्वीकारून लोकांना फसविणे.

१२. धर्म, पवित्र धर्मग्रंथ, देव-देवता यांच्या नावाखाली फसव्या असाधारण शक्तीचे प्रदर्शन करणे, स्वैर लैंगिक संबंध ठेवणे, लोकांना फसविण्यासाठी आणि ठकविण्यासाठी अनैतिक व भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणे.

१३. एखाद्या स्त्रीला, तिच्या अंधश्रद्धेचा फायदा घेऊन तिला फसवून आणि तिच्यावर अत्याचार करून तिच्या इच्छेविरुद्ध वेश्याकर्म करण्यास भाग पाडणे.

२००४ च्या विधेयकात समाविष्ट केलेल्या व कायदेशीररीत्या अपराध ठरविलेल्या दुष्ट व अघोरी इत्यादी प्रथांसंबंधी या कायद्याच्या विरोधकांनी अनेक हरकती व आक्षेप घेतले. प्रा.डॉ.एन.डी.पाटील व डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी त्या वेळी या हरकती स्वीकारण्यास आणि वरील प्रथांवर नमूद केलेल्या प्रथा वगळण्यास सहमती दर्शविली.

महाराष्ट्र शासनाने २००५ मध्ये तयार केलेल्या विधेयकात या प्रथा वगळून फक्त १२ दुष्ट व अनिष्ट प्रथा या कायद्यान्वये अपराध म्हणून शिल्लक ठेवण्यात आल्या, त्यांतही काही बदल करण्यात आले.

याच वेळी २००४ च्या विधेयकात एकंदर १४ कलमे होती, ती २००५ च्या विधेयकात जशीच्या तशी ठेवण्यात आली.

२००५ च्या विधेयकात जादूटोणा करणे किंवा अंध-विश्वासाचा अवलंब करणे याचा अर्थ स्पष्ट करण्यात आला होता, तो पुढे काढून टाकण्यात आला.

२००५ चे हे विधेयकसुद्धा त्यालाही होणाऱ्या विरोधामुळे कायद्यात रूपांतरित होऊ शकले नाही.

त्यानंतर पुढे ६ वर्षे वाट पाहावी लागली. दरम्यान २००७ मध्ये जरी हे विधेयक चर्चेसाठी विधान परिषदेसमोर मांडण्यात आले, तरी ते मंजूर न करता ‘संयुक्त चिकित्सा समिती’कडे पाठविण्यात आले. या समितीने या विधेकावर हरकती मागविल्या. विरोधकांनी समितीला जवळपास ३८ हजार पोस्टकार्डांच्या माध्यमातून आपल्या हरकती पाठविल्या. या विधेयकाच्या समर्थनार्थ ७८ हजार पोस्टकार्डे पाठविण्यात आली. महाराष्ट्राच्या कायद्याच्या इतिहासात इतक्या मोठ्या प्रमाणावर जनतेकडून दोन्ही बाजूंनी एवढा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दुसरे उदाहरण नाही, परंतु हा निरर्थक उपद्व्याप होता.

त्यानंतर या विधेयकाचा प्रवास २०११ पावेतो चालू राहिला. २०११ मध्ये मंत्रिमंडळाने चिकित्सा समितीचे मत विचारात घेऊन, २०११ च्या नव्या विधेयकास मंजुरी दिली. नंतर हे विधेयक विधानसभेत मांडण्यात आले. परंतु एप्रिल २०१३ पर्यंत ह्या विधेयकावर चर्चाही झाली नाही व त्याचे कायद्यात रूपांतरही झाले नाही.

या वेळी वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांच्या काही प्रतिनिधींनी २०११ च्या विधेयकासही आक्षेप घेतले. त्यावेळी मुख्यमंत्री ना.पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार आणि सामाजिक न्यायमंत्री ना.शिवाजीराव मोघे यांच्याशी वारकरी आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, तसेच प्रा.डॉ.एन.डी.पाटील, डॉ.नरेंद्र दाभोलकर व अविनाश पाटील यांच्याशी बैठका व चर्चा झाल्या. वारकऱ्यांच्या सूचनेप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी लहान-मोठे २० बदल करण्याचे मान्य केले. त्यांत प्रामुख्याने एखाद्या कंपनीकडून या कायद्याखाली अपराध घडला असेल; तर तिचे अध्यक्ष, संचालक, जबाबदार कर्मचारी यांना शिक्षा देण्याबाबतची तरतूद पूर्णपणे वगळण्यात आली व कंपनीचा उल्लेख टाळण्यात आला. त्यामुळे आता या कायद्यात१४ पैकी १३ कलमे शिल्लक राहिली, बाकी इतर बदल किरकोळ होते.

मुख्यमंत्र्यांनी हे बदल मान्य केले. आता हे विधेयक अंतिम स्वरूपात तयार झाले व ते मंजूर होऊन कायदा होईल, अशी आशा निर्माण झाली. परंतु झारीतल्या शुक्राचार्यांनी या विधेयकाचा पुढचा प्रवास वेळोवेळी खंडित केला. एप्रिल २०१३ पर्यंत व पावसाळी अधिवेशन संपल्यानंतरही या विधेयकांचे रूपांतर कायद्यात झाले नाही. दि.२६ ऑगस्ट २०१३ चा अध्यादेश काढण्यापूर्वी या कायद्यातील कलमे वगळण्यात आली. आता या कायद्यात फक्त ११ कलमे शिल्लक राहिली. या कायद्यातील शंका दूर करणारे व एखाद्या व्यक्तीचा अपराध सिद्ध होऊन त्याला शिक्षा झाल्यास त्याची पोलिसांकडून सार्वत्रिक प्रसिद्धी करण्याबाबतचे कलम वगळण्यात आले आहे.

या कायद्याच्या उद्देशासंबंधी जे निवेदन कायद्याच्या सुरुवातीस देण्यात आले होते; त्यातून अज्ञान, अंधविश्वास, दुष्ट रूढी इत्यादी शब्द वगळण्यात आले व त्यांच्यापासून सर्वसामान्य लोकांचे शोषण करण्यापासून संरक्षण या अर्थाचा मजकूरही वगळण्यात आला.

आता या कायद्याच्या परिशिष्टात ज्या अनिष्ट, दुष्ट, अघोरी, इत्यादी १२ प्रथांचा समावेश करण्यात आला आहे, त्या प्रथा खाली दिल्या आहेत.

१. भूत उतरविण्याच्या बहाण्याने एखाद्या व्यक्तीला, दोराने किंवा साखळीने बांधून ठेवून तिला मारहाण करणे, काठीने किंवा चाबकाने मारणे, तिला पादत्राणे भिजवलेले पाणी प्यायला लावणे, मिरचीची धुरी देणे, त्या व्यक्तीला छताला टांगणे, दोराने किंवा केसांनी बांधणे, त्या व्यक्तीचे केस उपटणे, व्यक्तीच्या शरीरावर-अवयवांवर तापलेल्या वस्तूंचे चटके देऊन इजा पोहोचविणे, व्यक्तीला उघड्यावर लैंगिक कृत्य करण्याची जबरदस्ती करणे, व्यक्तीवर अमानुष कृत्य करणे, व्यक्तीला जबरदस्तीने मूत्र किंवा विष्ठा खाऊ

घालणे किंवा यांसारख्या कोणत्याही कृती करणे.

२. एखाद्या व्यक्तीने तथाकथित चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून, त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे; अशा तथाकथित चमत्कारांचा प्रचार व प्रसार करून लोकांना फसवणे, ठकवणे आणि त्यांच्यावर दहशत बसविणे.

३. अलौकिक शक्तीची कृपा मिळविण्याच्या हेतूने ज्यामुळे जिवाला धोका निर्माण होतो किंवा शरीराला जीवघेण्या जखमा होतात अशा अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथांचा अवलंब करणे, अशा प्रथांचा अवलंब करण्यास इतरांना प्रवृत्त करणे अथवा प्रोत्साहन देणे.

४. मौल्यवान वस्तू, गुप्त धन आणि जलस्रोत यांचा शोध घेण्याच्या बहाण्याने वा तत्सम कारणाने करणी, भानामती या नावाने कोणतेही अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य आणि जादूटोणा करणे, जारणमारण यांच्या नावाने व त्यासारख्या अन्य कारणाने नरबळी देणे किंवा देण्याचा प्रयत्न करणे, किंवा अशी अमानुष कृत्ये करण्याचा सल्ला देणे, त्याकरिता प्रवृत्त करणे अथवा प्रोत्साहन देणे.

५. आपल्या अंगात अतींद्रिय शक्ती असल्याचे भासवून अथवा एखाद्या व्यक्तीत अतींद्रिय शक्ती संचारली असल्याचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे किंवा त्या व्यक्तीचे सांगणे न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे, फसवणे व ठकवणे.

६. एखादी विशिष्ट व्यक्ती करणी करते, जादूटोणा करते, भूत लावते किंवा मंत्र-तंत्राने जनावरांचे दूध आटवते असे सांगून त्या व्यक्तीबाबत तशी समजूत निर्माण करणे किंवा त्याचप्रमाणे एखादी व्यक्ती अपशकुनी आहे किंवा रोगराई पसरण्यास कारणीभूत ठरणारी आहे असे भासवणे, अशा व्यक्तीचे जगणे मुश्किल करणे, त्रासदायक करणे वा कठीण करणे; एखादी व्यक्ती सैतानाचा अवतार असल्याचे जाहीर करणे.

७. जारण-मारण, करणी किंवा चेटूक केल्याच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, तिची नग्नावस्थेत धिंड काढणे किंवा तिच्या रोजच्या व्यवहारांवर बंदी घालणे.

८. मंत्राच्या साह्याने भूत-पिशाचांना आवाहन करून, किंवा भूत-पिशाचांना आवाहन करीन अशी धमकी देऊन सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराट निर्माण करणे, एखाद्या व्यक्तीला शारीरिक इजा होण्यास भुताचा किंवा अतींद्रिय शक्तीचा कोप असल्याचा समज करून देणे, तिला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून त्याऐवजी तिला अमानुष, अनिष्ट व अघोरी कृत्य वा उपाय करण्यास प्रवृत्त करणे, जादूटोणा अथवा अमानुष कृत्ये करून किंवा तसा आभास निर्माण करून एखाद्याला मृत्यूची भीती घालणे, शारीरिक वेदना करण्याची किंवा तिचे अर्थिक नुकसान करण्याची धमकी देणे.

९. कुत्रा, साप किंवा विंचू चावल्यास एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय उपचार घेण्यापासून रोखून किंवा प्रतिबंध करून, त्याऐवजी मंत्र-तंत्र, गंडे-दोरे किंवा यांसारखे उपचार करणे.

१०. बोटाने शस्त्रक्रिया करून दाखवतो असा दावा करणे किंवा गर्भवती स्त्रीच्या गर्भाचा लिंगबदल करून दाखवतो असा दावा करणे.

११. (क) स्वतः विशेष अलौकिक शक्ती असल्याचे अथवा कुणाचा तरी अवतार असल्याचे वा स्वतःच पवित्र आत्मा असल्याचे भासवून किंवा त्याच्या नादी लागलेल्या व्यक्तीस पूर्वजन्मी तू माझी पत्नी, पती वा प्रेयसी, प्रियकर होता असे सांगून अशी व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणे.

(ख) मूल न होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्तीद्वारा मूल होण्याचे आश्वासन देऊन लैंगिक संबंध ठेवणे.

१२. एखाद्या मानसिक विकलांग व्यक्तीमध्ये अलौकिक शक्ती असल्याचे भासवून त्या व्यक्तीचा धंदा किंवा व्यवसाय यासाठी उपयोग करणे.

नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा, भोंदू लोकांकडून केले जाणारे जादूटोण्याचे व भूत-पिशाचाचे प्रयोग यामुळे समाजातील सर्वसामान्य लोकांचे शोषण होण्याच्या घटना उघडकीस येत असून हे प्रमाण अत्यंत भयावह आहे. अशा प्रकारे अंधश्रद्धा, जादूटोणा आणि दुष्ट प्रथांपासून सर्वथा व सर्वस्वी नव्हे तर काही थोड्या प्रमाणात संरक्षण करणारा हा कायदा व कायद्याचे जनक डॉ.नरेंद्र दाभोलकर आणि अंनिस अविश्रांत परंतु निराश न होता सर्व शक्तिनिशी गेले पावशतक वाटचाल करीत राहिले आणि डॉ.नरेंद्र दाभोलकर यांनी त्यासाठी हौतात्म्य पत्करल्यावरच या कायद्याचा दुःखद वातावरणात जन्म झाला. एखाद्याचा जन्म होण्यासाठी पावशतक प्रसूतिवेदना भोगण्याचे आणि त्याच्या जन्माच्या वेळीच मातेचे बलिदान झाल्याचे जगाच्या इतिहासात दुसरे उदाहरण नसेल.

**अविनाश पाटील**
राज्य कार्याध्यक्ष,
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती.
mob.: 9422790610, 8975130609
avinashpatilmans@gmail.com



दृष्टिक्षेप

मुक्ता दाभोलकर

# जादूटोणाविरोधी कायदा : वस्तुस्थिती आणि आक्षेप

दि.२० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात डॉ.दाभोलकरांची हत्या झाली. त्यानंतर दोन दिवसांत महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाने जादूटोणाविरोधी कायद्याचा वटहुकूम काढला. सहा महिन्यांच्या आत हा वटहुकूम कायद्यात रूपांतरित होणे आवश्यक होते. 'आत्ता नाही तर कधीच नाही' असे बहुसंख्य कार्यकर्त्यांना वाटत होते. अशा परिस्थितीत कायद्याला विरोध होणार, हे नक्कीच होतं. विरोध करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या. कायद्याविषयी गैरसमज पसरवणं, कायद्यातील कलमं सोडून वेगळ्याच मुद्यांवर चर्चा सुरू करणं, त्या मुद्यांच्या पुष्ट्यर्थ धडधडीत खोटं बोलणं- हे मार्ग विरोधकांनी मोठ्या प्रमाणात वापरले. कायद्याच्या मागणीसाठी लढत असताना डॉक्टरांनी ज्या आक्षेपांना अनेक वेळा उत्तरं दिलेली होती, त्याच आक्षेपांना कार्यकर्ते न थकता उत्तरे देत राहिले. समाजप्रबोधनाचे काम करताना विरोधकांशी संवाद साधण्यावरचा आपला विश्वास अभंग राहिला पाहिजे, ही डॉक्टरांनी आपल्या कृतीतून सातत्याने दिलेली शिकवण या संवादासाठी बळ देत राहिली.

'जादूटोणाविरोधी कायदा' या लोकप्रिय नावाने ओळखले जाणारे विधेयक १८ डिसेंबरला विधान परिषदेत संमत झाले आणि अशा व्यापक प्रकारचा जादूटोणाविरोधी कायदा करणारे महाराष्ट्र हे भारतातले पहिले राज्य ठरले. विधिमंडळात मंजूर झालेल्या कायद्यामध्ये अध्यादेशापेक्षा दोन गोष्टी वेगळ्या आहेत. त्याचा संदर्भ घेत कायदा 'मिळमिळीत' स्वरूपात मंजूर झाल्याच्या प्रतिक्रिया माध्यमांमधून उमटल्या, परंतु हे खरे नाही. कायद्यात झालेला पहिला बदल म्हणजे १२ व्या कलमात एक सुधारणांची सूची टाकण्यात आलेली आहे. हा कायदा कोणकोणत्या गोष्टींना लागू होत नाही, त्याची यादी यांमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. त्यात नमूद केलेल्या गोष्टी जादूटोणाविरोधी कायद्यानुसार कधीच गुन्हा ठरणार नव्हत्या. त्यामुळे 'या गोष्टी गुन्हा ठरणार नाहीत' असा विशेष उल्लेख कायद्यात करण्यात आल्याने कायद्याच्या स्वरूपात कोणताही फरक पडत नाही. आपण केलेल्या वाटाघाटींमुळे या गोष्टी कायद्यातून वगळण्यात आल्या आहेत, असे भासवण्याचा प्रयत्न या कायद्याचे विरोधक करत आहेत व करतीलच; परंतु कायद्यात या गोष्टी कधी नव्हत्याच, त्या कोणाच्या विरोधापोटी कायद्यातून वगळण्यात आलेल्या नाहीत, हे सुज्ञ माणसास सहज समजू शकेल. हा बचावाचा मुद्दा या कायद्यात घालण्यात आल्याचा एक फायदा म्हणजे, आता या कायद्याविषयी गैरसमज पसरवणे सोपे राहणार नाही. कारण या कायद्याविषयी अपप्रचार करताना असे सर्रास सांगितले जात होते

कायद्यामुळे ज्यांच्या हितसंबंधांना बाधा येते, ते लोक अशी हाकाटी करतच राहणार की या कायद्याचा दुरुपयोग केला जाईल; कोणत्या तरी परकीय शक्तींच्या सांगण्यावरून आपले सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. जातिव्यवस्थेमुळे होणारे दलितांचे शोषण, पितृसत्ताक व्यवस्थेमुळे होणारे स्त्रियांचे शोषण यांना विरोध करताना ज्याप्रमाणे कायदा गरजेचा आहे; त्याचप्रमाणे देव-धर्माच्या नावाने तयार झालेल्या व्यवस्थेतून होणारे कोणत्याही धर्माच्या सामान्य माणसाचे शोषण हे विशिष्ट सामाजिक रचनेमुळे केले जाणारे, धार्मिक उतरंडीच्या खालच्या पायरीवर असलेल्या माणसाचे शोषण आहे. ते रोखण्याकरता करण्यात आलेला हा कायदा माणसाच्या शोषणमुक्तीच्या लढ्याला निश्चितच एक नवा आयाम देईल.



की, कायदा झाला की वारीला जाता येणार नाही, संतांचे चमत्कार सांगणाऱ्या पोथ्या वाचता येणार नाहीत इत्यादी इत्यादी... सेव्हिंग क्लॉजमुळे आता अपप्रचार करता येणार नाही..

मंजूर कायद्यात करण्यात आलेला दुसरा बदल म्हणजे, जादूटोणाविरोधी कायदा मंजूर होण्याआधी वटहुकमानुसार कोणत्याही व्यक्तीला या कायद्याअंतर्गत झालेल्या गुन्ह्याची तक्रार करण्याचा अधिकार होता; त्याऐवजी आता पीडित व्यक्ती किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याने तक्रार दाखल करावी, असा बदल करण्यात आलेला आहे. भविष्यकाळात यात बदल करून कोणत्याही व्यक्तीला तक्रार दाखल करण्याचा अधिकार या कायद्यांतर्गत मिळाला पाहिजे, ही चळवळीची मागणी असणारच आहे; परंतु नातेवाइकांव्यतिरिक्त इतर व्यक्तीने तक्रार दाखल करण्याची तरतूद कायद्यात नसल्याने कायदा निष्प्रभ ठरत नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

या कायद्याच्या परिशिष्टात नमूद केलेल्या बाराव्या मुद्याखाली घडून येणारा प्रत्येक गुन्हा हा दखलपात्र आहे. त्यामुळे संबंधित पोलीस ठाण्यामधील जादूटोणाविरोधी कायद्याखाली नेमण्यात आलेला दक्षता अधिकारी अशा गुन्ह्याचा तपास स्वत:हून करू शकतो. असा गुन्हा घडणार आहे, अशी माहिती मिळाल्यास हस्तक्षेप करून अटक घडवून आणू शकतो.

भारतीय फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३९ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य आहे की, दखलपात्र गुन्हा घडत असल्याची त्याला/तिला माहिती असेल; तर ही माहिती त्या नागरिकाने पोलिसांना दिली पाहिजे. याच कायद्याच्या कलम ४३ नुसार एखादा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा जर एखाद्या व्यक्तीसमोर घडत असेल, तर पोलीस येईपर्यंत ती व्यक्ती गुन्हेगाराला अटक करून ठेवू शकते. तसेच भारतीय दंडविधान संहितेच्या कलम २०२ नुसार एखाद्या व्यक्तीला गुन्हा घडल्याची माहिती असेल व ही माहिती पोलिसांना देणे हे तिचे कर्तव्य असेल, तरीही तिने ती माहिती पोलिसांना दिली नाही; तर त्या व्यक्तीला कायद्याने शिक्षा होऊ शकते.

जादूटोणाविरोधी कायद्याखाली त्रयस्थ व्यक्तीला तक्रार दाखल करता येईल, असा बदल कायद्यात होईपर्यंत सजग सामान्य नागरिक व कार्यकर्ते वर नमूद केलेल्या प्रावधानांचा उपयोग करून घेऊन पोलिसांकडे तक्रार दाखल करू शकतात. अशी तक्रार दाखल करणे, हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा केवळ अधिकार नाही तर ते त्याचे/तिचे कर्तव्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, अशा प्रकारे गुन्हा घडत असल्याची माहिती पोलिसांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्याची दखल घेऊन गुन्हा दाखल करणे हे

पोलिसांना बंधनकारक आहे. त्रयस्थ व्यक्तीने तक्रार दाखल करण्याचे महत्त्व जेव्हा अशा काही केसेसमधून अधोरेखित होईल, तेव्हा कायद्यात ही सुधारणा करण्यावर शासन अधिक तत्परतेने विचार करेल. तोपर्यंत वर नमूद केलेल्या तरतुदींचा उपयोग करून आपले काम अडणार नाही याची काळजी घेणे आपल्याला शक्य आहे.

कायद्यासंबंधी नेहमी घेतले जाणारे अजून काही आक्षेप आहेत. त्यांतील एक असा आहे की, अनिष्ट प्रथा व नरबळी रोखण्यासाठी भारतीय दंडविधानात पुरेशी तरतूद आहे. त्याचा कठोरपणे वापर न करता अजून एक वेगळा कायदा कशासाठी? अस्तित्वात असलेले कायदे जेव्हा आवश्यक तो परिणाम घडवून आणण्यात अपुरे पडतात, त्या वेळी नवा कायदा केला जातो. उदा.– मारहाण करणे हा कायद्याने गुन्हा होता; परंतु अस्पृश्यांना मारहाण, कुटुंबातील स्त्रीला मारहाण यासाठी स्वतंत्र कायदे करण्यात आले.

नेहमी ज्याविषयी बोलले जाते, असा अजून एक गैरसमज म्हणजे नरबळी दिला तर आत्तापर्यंत फाशी किंवा जन्मठेपेची शिक्षा होत असे आणि जादूटोणाविरोधी कायद्याखाली जास्तीत जास्त सात वर्षे शिक्षेची तरतूद आहे. या आक्षेपाचा उच्चार करणाऱ्यांना हे माहीत नसेल हे गृहीत धरणे कठीण वाटते. संबंधित गुन्ह्याला लागू असलेले सर्व कायदे एकत्र वाचले जाऊन, जास्तीत जास्त शिक्षा अशा गुन्ह्यांत होणार, हे उघड आहे. जादूटोणाविरोधी कायद्याचे महत्त्व हे आहे की, नरबळी देण्याचा प्रयत्न करणे किंवा नरबळी देण्याचा सल्ला देणे, त्याकरिता प्रवृत्त करणे, प्रोत्साहन देणे या गोष्टीदेखील या कायद्यानुसार दखलपात्र गुन्हा आहेत. प्रचलित कायद्यानुसार नरबळी घडून गेल्यानंतर– माणसाचा जीव गेल्यानंतर– शिक्षा होऊ शकत असे.

कायद्याविषयी घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना उत्तरे देणारी 'जादूटोणाविरोधी कायदा : आक्षेप व वस्तुस्थिती' ही पुस्तिका महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने प्रकाशित केलेली आहे. अधिवेशनाच्या आधी विधानसभा व विधान परिषदेतील सर्व आमदारांना ती पाठविण्यात आलेली होती. सर्वसामान्यांपर्यंत कायदा पोहोचावा व त्यांच्या शंकांचे निरसन व्हावे, यासाठी महाराष्ट्र अंनिसने जादूटोणाविरोधी कायद्याची सचित्र पुस्तिकाही काढली आहे. फक्त ५ रुपये एवढ्या अल्प किमतीत ती उपलब्ध आहे. साप्ताहिक 'कलमनामा'चे संपादक युवराज मोहिते यांनीही अशी एक पुस्तिका प्रकाशित केलेली आहे. कायद्यावरील आक्षेपांना उत्तरे देणे व वस्तुस्थिती लोकांसमोर मांडण्याचे काम वारकरी संप्रदायातील अनेकांनी केले. प्रा.सदानंद मोरेंच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी विवेकाची वारी काढली व वारकरी संप्रदायातील लोकांशी कायद्याविषयी गावोगावी संवाद केला. वारकरी साहित्य परिषदेचे श्री.विठ्ठल पाटील, शामसुंदरमहाराज सोन्नूर यांनी अनेक फडकरी व दिंडीकऱ्यांशी संवाद साधला व कायद्याविषयीचे त्यांच्या मनातील गैरसमज दूर केले. अक्षय भोसले या तरुण वारकऱ्याने फेसबुकवरून वारकरी संप्रदायातील अनेकांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले, त्यानंतर त्याला धमकीही देण्यात आली. वारकरी संप्रदायात कायद्यासंबंधी संवाद घडून येणे, सामान्य वारकऱ्यांच्या शंकांचे निरसन होणे आणि वारकरी संप्रदायांचे मर्म असलेला पुरोगामी परिवर्तनवादी विचार हा वारकरी परंपरेचे पाईक असलेल्या तरुणांकडून आग्रहाने मांडला जाणे, हे फार महत्त्वपूर्ण सामाजिक चलनवलन यानिमित्ताने घडून आले.

कायद्यामुळे ज्यांच्या हितसंबंधांना बाधा येते, ते लोक अशी हाकाटी करतच राहणार की या कायद्याचा दुरुपयोग केला जाईल; कोणत्या तरी परकीय शक्तींच्या सांगण्यावरून आपले सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. जातिव्यवस्थेमुळे होणारे दलितांचे शोषण, पितृसत्ताक व्यवस्थेमुळे होणारे स्त्रियांचे शोषण यांना विरोध करताना ज्याप्रमाणे कायदा गरजेचा आहे; त्याचप्रमाणे देव–धर्माच्या नावाने तयार झालेल्या व्यवस्थेतून होणारे सामान्य माणसाचे शोषण हे विशिष्ट सामाजिक रचनेमुळे केले जाणारे, धार्मिक उतरंडीच्या खालच्या पायरीवर असलेल्या माणसाचे शोषण आहे. ते रोखण्याकरता करण्यात आलेला हा कायदा माणसाच्या शोषणमुक्तीच्या लढ्याला निश्चितच एक नवा आयाम देईल.

***ताजा कलम :*** कायदामंजुरीच्या प्रक्रियेचे साक्षीदार राहून आम्ही जेव्हा नागपूरहून परत आलो, तेव्हा बातमी कळली की जादूटोणाविरोधी कायद्याखाली अजून एक केस दाखल झाली आहे. पुण्यात विश्रांतवाडी पोलीस स्टेशनने एका मुस्लिम तांत्रिक बाबाला, जादूटोणाविरोधी कायद्याखाली अटक केली आहे. त्या बाबाने तक्रारदार स्त्रीला तिच्या समस्याहरणासाठी केस मोकळे सोडून नग्न अवस्थेत पूजा करायला सांगितली होती. वस्तुस्थिती समोर येते, तेव्हा आक्षेपांना सर्वांत प्रभावीरीतीने उत्तर मिळते.

**मुक्ता दाभोलकर**
muktadabholkar@gmail.com
mob.: 9423297969

पुनर्भेट

# विजय तेंडुलकर यांना... एका तरुणाचे अनावृत पत्र

आदरणीय विजय तेंडुलकर,

दि. २ नोव्हेंबरची गोष्ट. दिवाळी सुट्टी संपवून पुण्यात आलो होतो. ‘सकाळ’मधली जाहिरात वाचली. “ ‘सृष्टी’चा चालता-बोलता दिवाळी अंक : विजय तेंडुलकरांच्या साहित्यिक कारकिर्दीचा रंगमंचीय आविष्कार.” मी रोमांचित झालो. पण पुढे कंसात लिहिलेलं वाचलं- ‘फक्त सृष्टीचे सभासद व निमंत्रितांसाठी’. मग थोडा निराश झालो. सृष्टीचा मी सभासद नव्हतो आणि आमंत्रणाचा तर प्रश्नच नव्हता. फार मोठ्या कार्यक्रमाला आपण मुकतोय, असं वाटलं. म्हणून एका मित्राला विचारलं, ‘काही व्यवस्था होईल का?’ त्याने ताबडतोब सृष्टीच्या व्यवस्थापकांना फोन लावला आणि मला निमंत्रण मिळवून दिलं.

सकाळी बरोबर दहा वाजता ‘सिम्बायोसिस’च्या ‘विश्वभवन’ इमारतीत पोहोचलो. कार्यक्रम सुरू व्हायला बराच अवकाश होता, म्हणून कार्यक्रमाला येणारी माणसं निरखू लागलो. ‘कला’ आणि ‘साहित्य’ वर्तुळातील जाणकार व दिग्गज मंडळी पाहून मला माझ्या सामान्यत्वाची प्रकर्षानं जाणीव झाली. म्हणून प्रवेशद्वारावरील आर. के. लक्ष्मण यांच्या ‘कॉमन मॅन’चा पुतळा बारकाईने पाहत बसलो.

‘कार्यक्रम’ वेळेवर सुरू झाला आणि तब्बल तीन तास चालला. तुमच्या विविध भावमुद्रा टिपलेली छायाचित्रं सुरुवातीलाच दाखवली गेली. त्याच्या जोडीला ‘निवेदन’ जाणीवपूर्वक दिलं नसावं, हे चटकन लक्षात आलं. ‘चित्रं वाचायची असतात’, असं तुमच्याच एका लेखात वाचलं होतं.

दुपारनंतरच्या दोन सत्रांत तुमच्या काही साहित्याचं वाचन झालं. तुम्ही स्वत:वर लिहिलेल्या व इतरांनी तुमच्यावर लिहिलेल्या लेखांचंही वाचन झालं. जब्बार पटेल, निळू फुले, श्रीराम लागू आदी रथी-महारथींच्या प्रतिक्रिया ऐकल्या. साहित्य, नाटक व चित्रपट क्षेत्रांतील तुमचं अफाट कर्तृत्व आणि तुमचं अथांग व्यक्तिमत्त्व यांचा धावता आढावा घेणारा ‘चित्रपट’ पाहिल्यासारखं वाटलं. अत्यंत आखीव-रेखीव झालेल्या कार्यक्रमांमुळे विश्वभवनमधील साडेतीनशे लोकांप्रमाणेच मीसुद्धा भारावून गेलो.

समारोपाच्या सत्राच्या शेवटी व्यासपीठावरील वक्ते श्रोत्यांत येऊन बसले. रात्रीचे नऊ वाजून गेले होते. संपूर्ण रंगमंच तुमच्यासाठी मोकळा करून दिला. तुमच्या नावाची उद्घोषणा करून सूत्रसंचालक सुधीर गाडगीळ बाजूला गेले.

आधीचे तीन तास सभागृहात ‘पिनड्रॉप सायलेन्स’चे वातावरण होतेच; पण तुमच्या नावाची उद्घोषणा झाल्यावर त्या शांततेला आणखी गांभीर्य आलं. साऱ्यांच्या नजरा व्यासपीठाच्या मध्यभागावर खिळल्या आणि तेवढ्यात सतीश आळेकरांनी तुम्हाला व्यासपीठावर आणून सोडलं. आळेकर पाठीमागे निघाले तेव्हा, तुम्ही हातातले कागद त्यांच्याकडे दिले.

तुमची ती उंच व भरदार शरीरयष्टी. दाढीमुळे व्यक्तिमत्त्वाला आलेले वेगळे परिमाण. हिरवे जाकीट आणि ढगळ कुर्ता-पायजमा अशा वेषात तुम्ही रंगमंचावर मध्यभागी सम्राटाच्या आविर्भावात आसनस्थ झालात. दीर्घ श्वास घेऊन बोलायला सुरुवात केलीत. सभागृहातील प्रत्येक जण तुमचा प्रत्येक शब्द ऐकण्यासाठी आतुर झालेला.

सुरुवातीची तीन-चार मिनिटे तुम्ही फार सौम्यपणे बोललात. त्यानंतर मात्र...

“आपल्याविषयी इतके गैरसमज मी का पसरविले, असा मला एक मूलभूत प्रश्न आहे... माझ्या कणखरपणाविषयी, दमदारपणाविषयी इथे बोललं गेलं... पण मी अनेकदा ढसढसा रडलेलो आहे... अलीकडे तर मी जास्त रडतो... माझ्यातलं जे मूल आहे, ते रडतंय... ‘लेखणी हे शस्त्र आहे’ असं कोणी म्हटलंय, मला माहीत नाही... मला मात्र असं वाटतंय की, माझ्या हातात खरं शस्त्र असायला पाहिजे होतं... लेखणीने खून होऊ शकत नाही म्हणून मी रडतो...

मला असं वाटतं की, काही माणसांना जगण्याचा हक्क असता कामा नये... त्यांना आपण जगू देतो, हा आपला गुन्हा आहे... त्या लोकांना मारलं पाहिजे... त्या लोकांचा मारेकरी व्हायला मला आवडेल... तो मी होऊ शकत नाही, हे माझं फार मोठं दु:ख आहे... लेखक म्हणून माझी ताकद इतकी कमी आहे की, मी त्यांचं काहीही करू शकत नाही... पुनर्जन्मावर माझा विश्वास नाही... पण तो मिळाला तर मी म्हणेन- मला लेखणी नको, शस्त्र हवं. मला फार आयुष्यही नको... काही मोजकी माणसंच मी मारणार आणि न्यायालयासमोर जाऊन सांगणार की, मी विचारपूर्वक यांना मारलं आहे... आणि ती पुन्हा समोर आली, तर या शस्त्राने मी त्यांना पुन्हा मारीन...''

तेंडुलकर सर, तुम्ही एक-एक वाक्य 'पॉझ' घेऊन धीरगंभीर आवाजात उच्चारत होता आणि सारं सभागृह अवाक् झालं होतं. तुम्ही बोलत होता आणि श्रोते श्वास रोखून ऐकत होते. एकही शब्द निसटून जाऊ नये म्हणून, कान गोळा करून ऐकत होते. अनेकांच्या हृदयाचे ठोके मंदावले होते. माझी अवस्थाही यापेक्षा वेगळी नव्हती. प्रत्येक शब्द मोजून, मापून, तासून वापरणाऱ्या वक्त्याच्या तोंडून इतकं स्फोटक व इतकं प्रक्षोभक भाषण ऐकण्याची त्या सर्वांची बहुधा पहिलीच वेळ असावी.

अवघी दहा मिनिटे तुम्ही बोललात... अनेकांप्रमाणे मीसुद्धा टाळ्या वाजवायचे विसरून गेलो. कार्यक्रम संपल्यावर काही लोक व्यासपीठावर गर्दी करतात, बाकीचे बाहेर पडण्यासाठी गलबला करतात. पण त्या दिवशी मात्र व्यासपीठावर यायला फारसं कोणी उत्सुक नव्हतं. सर्वजण सुन्न मनाने, शांतपणे बाहेर पडत होते. रात्रीचे साडेनऊ वाजले होते, पण घाई कोणालाच नव्हती. सभागृहातून बाहेर आल्यावरही लोक आपापसांत बोलत नव्हते. आवाज न करता गाड्या बाहेर काढण्याचा प्रयत्न करत होते.

मी बाहेर पडताना क्षणभर 'कॉमन मॅन'च्या पुतळ्याजवळ थबकलो. नंतर एका धुंदीतच घराकडे चालत राहिलो. वाटेत रिक्षा घ्यायची आहे, हे विसरून गेलो. तडातड चालतच दोन-अडीच किलोमीटर कधी आलो, ते कळलंच नाही. घरी आल्यावर थोडंफार पोटात ढकलून बेडवर आडवा झालो. रात्री चालूच राहिलेल्या रेडिओमुळे सकाळी लवकर जाग आली. उठून बसलो. बराच वेळ तसाच. डोकं जड पडलं होतं. दारू प्यायल्यावर नशा चढते म्हणतात, मला त्याचा अनुभव नाही; पण ती नशा कशी असू शकते, याचा अंदाज आला. त्या दिवशी दुपारपर्यंत मी त्या नशेतच होतो.

गेल्या दहा वर्षांत निदान पाचशे कार्यक्रमांना मी उपस्थिती लावली असेल; पण हा कार्यक्रम अद्‌भुत होता, अवर्णनीय होता, अविस्मरणीय होता.

नंतरचे दोन-तीन दिवस त्या कार्यक्रमाचा वृत्तान्त माझ्या जवळच्या लोकांना सांगत होतो. 'सामान्य माणसांच्या मनातील भावनाच तुम्ही व्यक्त केल्यात' असं तुम्हाला ओळखणाऱ्यांचं म्हणणं होतं. काही प्रतिक्रिया मात्र तुमच्याइतक्याच टोकाच्या होत्या.

एक सज्जन- दुर्मिळ पुस्तकांचे विक्रेते- म्हणाले, ''तेंडुलकर अर्धंच बोलले. त्यांनी हे सांगायला पाहिजे होतं की, फाळणीच्या वेळी लाखो लोकांच्या कत्तली झाल्या, त्याला जबाबदार गांधी होते. म्हणून नथुरामने केलं, ते योग्यच होतं.''

दुसरा म्हणाला, ''त्या लोकांचा खून करणं राहू दे, निदान त्यांची नावं सांगायचं धाडस तरी तेंडुलकरांनी करायला हवं होतं!''

तिसऱ्याने मलाच प्रतिप्रश्न केला, ''मुंबईत पिस्तुल मिळवणं अवघड नाही. मग तेंडुलकर भाषणं करण्यापेक्षा कृती का करत नाहीत?''

चौथ्याने जाहीर केलं, ''गेली कित्येक वर्षे बाळासाहेब सांगत होते, ते यांनी आत्ता सांगितलंय. यात नवीन आणि विशेष ते काय आहे?''

पाचव्याने हसत-हसत सांगितलं, ''वयाची पंच्याहत्तरी पार केल्यावर कळलं यांना. उशिरा सुचलेलं शहाणपण- दुसरं काय!''

आणखी काही प्रतिक्रिया अशा होत्या... ''तेंडुलकरांचं दुसरं बालपण सुरू झालंय...'', ''प्रकाशझोतात कसं राहायचं, ही कला ह्या माणसाला चांगली जमते''... ''वैफल्यग्रस्त माणसाचे बोल आहेत, गांभीर्याने घ्यायचे नसतात.''... ''कौटुंबिक आघातामुळे तेंडुलकरांचे मानसिक संतुलन बिघडलेय...'' ...''तेंडुलकर नाटककार आहेत, हेही त्यांचं एक नाटकच आहे!''

या प्रतिक्रियांनी माझ्या विचारप्रक्रियेला चालना दिली, हे खरं; पण इतकी वरवरची आणि उथळ प्रतिक्रिया देणं मला तरी शक्य नव्हतं. कारणं अनेक होती. तुमची पाच-सात भाषणं मी ऐकली होती. चार-पाच नाटकं पाहिली होती. दहा-बारा पुस्तकं वाचली होती. 'सामना' चित्रपट तर सोळा वेळा पाहिला होता. तुम्ही स्वत:वर लिहिलेलं, इतरांनी तुमच्यावर लिहिलेलं आधाशासारखं वाचलं होतं. तुमच्यातला लेखक मोठा की माणूस- यावर बराच विचार केला होता. तुमच्या जीवनशैलीनं जबरदस्त प्रभावित झालो होतो. या सर्वांचा परिणाम म्हणून तुम्हाला 'कॉन्शस कीपर' मानत होतो.

म्हणून सदसद्‌विवेकबुद्धीला जागृत ठेवून तुमच्या भाषणाचं विश्लेषण करू लागलो. एव्हाना, भाषेची मर्यादा नको तितकी कळू लागल्याने तुम्हाला नेमकं काय म्हणायचंय, तिथपर्यंत




पोहोचण्याचा प्रयत्न करू लागलो. तुम्हाला अभिप्रेत असलेला आशय शोधू लागलो. या साऱ्या डोकेफोडीतून माझी एक ओळीची प्रतिक्रिया तयार झाली. ती प्रतिक्रिया मी कुणी न विचारताच देत राहिलो...

''तेंडुलकरांच्या भावना मी समजू शकतो; पण त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांशी मी सहमत नाही!''

होय तेंडुलकर सर, तुमच्या भावनांशी मी पूर्णत: सहमत आहे. सभोवताली जे चाललंय, ते उद्वेग आणणारं आहे. माणूस दिवसेंदिवस भौतिक, वैज्ञानिक प्रगती करतो आहे; पण त्याच वेगाने नैतिक अधोगती होत आहे. चंगळवाद, भोगवाद सर्व स्तरांवर बोकाळला आहे. मूल्यं हरवलेल्या माणसांची पैदास केली जात आहे. चारित्र्य, सहिष्णुता या संकल्पना हद्दपार होण्याच्या मार्गावर आहेत. 'यश' आणि 'कर्तृत्व' शब्दांचे अर्थच बदलले आहेत. जातीयवाद व धर्मांधता हिडीस स्वरूपात पुढे येत आहे. हे सारं पाहताना कोणत्याही विवेकी माणसाला क्लेश होणारच; तसे ते तुम्हालाही होत असणार!... पन्नास वर्षांपूर्वी गंगाधर गाडगीळांनी 'किडलेली माणसे' या नावाची कथा लिहून खळबळ उडवून दिली होती आणि आता तुम्ही 'किडलेली समाजव्यवस्था' या निष्कर्षावर आला आहात.

तुमचं प्रक्षोभक भाषणच सांगतंय, लोकशाहीच्या चारही स्तंभांवर– किंबहुना, 'लोकशाही' व्यवस्थेवरच– तुमचा विश्वास राहिलेला नाही. आणि मग तुम्हाला काय करावंसं वाटतंय किंवा पुनर्जन्म मिळाला तर काय करायला आवडेल, ते तुम्ही सांगितलंत; पण इतरांनी काय करावं, हे नाही सांगितलंत– म्हणून मी अस्वस्थ आहे.

त्यामानाने तुमचं सोपं आहे तेंडुलकर सर! पंचाहत्तर वर्षांचं आयुष्य उपभोगून 'जीवननाट्यातून' एक्झिट घेण्याच्या मार्गावर आहात तुम्ही! पण माझं काय? माझ्या पिढीचं काय? तुम्हाला आदरणीय मानणाऱ्यांचं काय? तुम्ही म्हणता तशा किडलेल्या समाजव्यवस्थेला सामोरं जायचंय माझ्या पिढीला. पाय रोवून उभं राहायचंय. जमलंच तर थोडंफार कर्तृत्व गाजवायचंय. माझ्या पिढीसाठी गाईड आणि गुरू उरले नाहीत. तुमच्यासारखे थोडे 'कॉन्शस कीपर' आहेत; पण तुम्ही तर सरळ हात वर करून मोकळे झालात... मग आम्ही काय बोध घ्यायचा तेंडुलकर सर? तुम्ही म्हणता तसं हातात पिस्तुल घेऊन गोळ्यांच्या फैरी झाडायच्या?

पण सर, तुमचाच कित्ता गिरवायचा ठरवलं; तर कोणाकोणाला गोळ्या घालायच्या, त्यांची यादी करावी लागेल. गोळ्या घालायचे अधिकार कोणाकोणाला द्यायचे, त्यांचीही यादी करावी लागेल. या दोन्ही याद्यांतच भ्रष्टाचार

होण्याची शक्यता जास्त आहे. आणि समजा- भ्रष्टाचार नाहीच होऊ दिला, तरी 'एकमत' होणं अशक्य आहे. मग?

आदरणीय तेंडुलकर सर, तुम्ही केलेली यादी मला मान्य होईल; पण तुमच्यासारख्याच दुसऱ्या एखाद्या सत्शील व चारित्र्यवान माणसाने अशी यादी केली, तर कदाचित तो माणूस त्याच्या यादीत तुमचंही नाव घालील. तुम्ही प्रक्षोभक नाटकं लिहून समाजात दुफळी माजवलीत, असा आरोप तुमच्यावर ठेवला जाईल. गांधींच्या हत्येचं समर्थन करणारे खूप लोक या देशात आहेत; मग तुमच्या खुनाचं समर्थन करणं अशक्य का आहे?

म्हणून सर, तुमच्या भावना मी समजू शकतो; पण तुम्ही व्यक्त केलेल्या विचारांशी मी सहमत नाही!

कमीत कमी दोष असणारी शासनप्रणाली निवडायची असेल, तर 'लोकशाही'ला पर्याय नाही. आणि लोकशाहीचे सर्वच स्तंभ खिळखिळे झाले असतील, तर ते समाजस्वास्थ्य बिघडल्याचं लक्षण असतं. दीर्घ काळच्या कुव्यवस्थेने समाज-स्वास्थ बिघडले, तर त्यासाठीची उपाययोजनाही दीर्घकालीन असावी लागते, हे काय तुमच्यासारख्यांना सांगायला हवं?

बाकी, तुम्हाला मानलं सर! अस्वस्थ समाजाचं प्रतिनिधित्व करणं, त्याच्या भाव-भावनांचं चित्रण करणं हे कोणत्याही साहित्यिकाचं आद्यकर्तव्य मानलं जातं. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला, जनमताची पर्वा न करता, मोठं धाडस दाखवून असं कर्तव्य बजावणारा पहिला मराठी लेखक म्हणून भावी इतिहासकार तुमचा उल्लेख करतील. अजगराप्रमाणे सुस्तावलेल्या समाजाला, झोपेचं सोंग घेऊन पडलेल्या मराठी साहित्यविश्वाला डिवचण्याचं काम तुम्ही केलंत; त्याबद्दल मात्र तुम्हाला धन्यवाद दिले पाहिजेत!

तेंडुलकर सर, गेल्या वर्षभरात तुम्हाला पत्र लिहायचे प्रसंग तीन वेळा आले. श्री.पु.भागवतांसारख्या सत्शील व्यक्तीने मनोहर जोशींसारख्या अभद्र व्यक्तीच्या हस्ते पुरस्कार घेऊ नये, असं आवाहन करणारं तुमचं ते प्रसिद्ध पत्र... त्यानंतर अमेरिकेतील मराठी जनांसमोर 'उपकार-औदार्य-त्याग' या संकल्पनांवर घेतलेला पाठ- हा दुसरा प्रसंग. आणि सिम्बायोसिस विश्वभवनमधील भाषण हा तिसरा प्रसंग. तीनही वेळा कागद-पेन घेऊन बसलो; पण 'आदरणीय विजय तेंडुलकर' लिहून थांबलो.

पण परवा दापोलीला झालेल्या तुमच्या भाषणाचा वृत्तान्त वाचला. 'माझ्या हातात पिस्तुल दिलं, तर मी सर्वप्रथम नरेंद्र मोदींवर गोळ्या झाडेन', हे तुमचं अपेक्षित विधान वाचलं; तेव्हा माझ्या आतले विचारकल्लोळ पुन्हा उफाळून आले. ते सर्व बाहेर ओकल्याशिवाय स्वस्थ बसणंच अशक्य झालं. म्हणजे माझी मानसिक गरज म्हणून हे पत्र लिहिलं. पत्रात लहान तोंडी मोठा घास घेण्याचा प्रयत्न दिसेल; पण त्याला माझा नाइलाज आहे.

**विनोद शिरसाठ**
१७ डिसेंबर २००३

## पार्श्वभूमी

३ जानेवारी २००४ च्या साधना अंकात 'विजय तेंडुलकर यांना...' हा लेख 'कव्हर स्टोरी' म्हणून प्रसिद्ध झाला. त्यानंतर दोन दिवसांनी डॉ.नरेंद्र दाभोलकर यांची भेट झाली. त्या पहिल्याच भेटीत डॉक्टरांनी या लेखातील भाषा व त्यातून दिसणारे माझे वाचन याबद्दल कौतुक केले यात विशेष काही नाही. पण त्याच भेटीत ते म्हणाले, 'तुझी विचारांची दिशा योग्य आहे'. तेव्हा हे मला फार मोठे प्रशस्तीपत्र वाटले होते, आजही वाटते. कारण साधनात व एकूणातच मी लिहिलेला खऱ्या अर्थाने हा पहिला लेख. त्याच भेटीत डॉक्टरांनी मला साधनासाठी सदर लिहायला सांगितले. मग 'लाटा-लहरी' (भावनांच्या लाटा आणि विचारांच्या लहरी) हे सदर वर्षभर चालले... आणि मी साधनाशी जोडला गेलो! त्यानंतर अतिथी संपादक, संपादक मंडळातील सदस्य, युवा संपादक, कार्यकारी संपादक हे सर्व टप्पे भरभर उलटत गेले...

डॉ.दाभोलकरांची हत्या झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी मला जे संपादकीय लिहावे लागले (हत्तीचे बळ आणायचे कुठून?) त्यात विजय तेंडुलकरांना अनावृत पत्र या लेखाचा संदर्भ आला होता. त्यामुळे गेल्या साडेतीन महिन्यांत अनेक वाचकांनी तो लेख कुठे वाचायला मिळेल, अशी विचारणा केली. (२००७ पूर्वीचे अंक वेबसाईटवर नसल्याने हा लेख वेबसाईटवरही नाही.) त्यामुळे... आणि साधनाशी मला जोडणाऱ्या या लेखाच्या प्रसिद्धीला ३ जानेवारी २०१४ रोजी बरोबर दहा वर्षे पूर्ण होत आहेत, म्हणून हा लेख पुनर्मुद्रित करणे औचित्यपूर्ण वाटते. हा लेख वाचकांसमोर पुन्हा ठेवताना मनात, गेल्या दशकभरातील डॉक्टरांच्या सहवासातील अनेक प्रेरणादायी आठवणी आहेत आणि यापुढे आपले काहीही वाचायला डॉक्टर नाहीत ही रिकामेपणाची भावनाही!

**- संपादक**

जानेवारी २०१४ मध्ये येणारे साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

## समता-संगर : डॉ. नरेंद्र दाभोलकर

गेल्या १५ वर्षांतील साधनातील ५० संपादकीय लेख

- वारसा आणि वसा
- सरकार मिलीजुली, जनतेला वाली कोण?
- निर्णयात कमी, अनैतिकतेची हमी
- आजच्या राजकीय अस्थिरतेची आद्य कारणे
- क्रिकेट : क्रीडाधुंदी की व्यापारी नशा?
- हे पक्ष की संधिसाधूंचे मेळे?
- प्रतिशोध आणि विवेक
- भावी इतिहास हमारा है
- दहशतवादी दारूचा मुकाबला
- कसेल त्याची जमीन, नसेल त्याचे काय?
- अंधार आणि प्रकाशकिरण
- और इन्सान मर गया...
- सद्‌भावनेमागे जनसामर्थ्य हवे आहे
- प्रिय एस. एम. (अनावृत पत्र)
- दुष्काळ पाण्याचा व संवेदनशीलतेचा
- विवेकच सरतो तेव्हा
- सत्तेचा सोक्षमोक्ष एकत्रच लावावा
- जागतेऽऽ रहोऽऽ
- राजकारण- विवेकाचे आणि सूडाचे
- समस्यांचे सीमोल्लंघन जमेल?
- हवे आहेत हजारो हात
- करिष्मा किती, कमिटमेंट किती?
- बाराव्या शतकात महाराष्ट्र?
- अंधश्रद्धेचा ऑक्टोपस
- जात ओलांडण्यापासून जाति-अंताकडे
- हा थोर गांडुळांचा भोंदू जमाव आहे?
- सुसंस्कारित राजकारणी
- वारीचे सामर्थ्य समता-संगराला लाभावे
- गुटखाबंदीच्या यशासाठी पंचसूत्री
- रविशंकर यांचे अडाणीपण, नागनाथअण्णांचे शहाणपण
- अफूशेतीचे पीक : वैचारिक दिवाळखोरी
- बरेच अधिक, काही उणे
- पर्यावरणस्नेही गणेशविसर्जन
- अध्यात्म : असली आणि नकली
- सत्य (साईबाबांना) स्मरून सांगायचे तर...
- चिकित्सेचे धर्मकारण की प्रसिद्धीचे राजकारण?
- अण्णांच्या आंदोलनाचे आकलन
- मुजोर प्रवृत्ती आणि मुजरा प्रवृत्ती
- प्रधार सर : कृतार्थ साधक
- व्यर्थ न हो बलिदान!
- समता-संगराची पंचसूत्री
- सत्यशोधकांसमोरील आजचे आव्हान
- सायोनारा आणि सुस्वागतम
- मेधाताई, तुमची खूप खूप गरज आहे
- विकासगंगेची दिशा कोणती?
- हळू म्हणजे किती हळूहळू?
- ही क्षमायाचना आहे, कर्जमाफी नव्हे!
- आता उठवू सारे रान
- हक्क हवाच, समतेचा संवादही हवा
- मुख्यमंत्र्यांच्या सामाजिक इच्छाशक्तीची सत्त्वपरीक्षा

# साथी किशोर पवार प्रतिष्ठान

सप्रेम नमस्कार,

'स्व'चा त्याग करून समाजासाठी, समतेसाठी, न्यायासाठी आणि कामगारांच्या हक्कांसाठी आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिलेले ज्येष्ठ समाजवादी नेते साथी किशोर पवार यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त गुरुवार, दि. २ जानेवारी २०१४ रोजी, एस.एम.जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, नवी पेठ, पुणे येथे खालील कार्यक्रम आयोजित केले आहेत.

**दुपारी ३ ते ४-३० वा.**

**जादूटोणाविरोधी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संवाद**

वक्ते - **अविनाश पाटील** (कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंनिस) सादरीकरण - **शहाजी भोसले**

**साथी किशोर पवार प्रतिष्ठान**तर्फे पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित केला आहे.

| पुरस्कार हस्ते | कार्यक्रमाचे अध्यक्ष | प्रमुख पाहुणे |
|---|---|---|
| **मा.ना.हर्षवर्धन पाटील** | **मा.ना.बाळासाहेब थोरात** | **मा.ना.हसन मुश्रीफ** |
| सहकारमंत्री, महाराष्ट्र राज्य | महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य | कामगारमंत्री महाराष्ट्र राज्य |

**साथी किशोर पवार 'सहकार साखर उद्योगभूषण पुरस्कार'**

**मा.आ.आप्पासाहेब सा.रे.पाटील**

साथी किशोर पवार **'श्रमिक कार्यकर्ती रत्न पुरस्कार' : सौ. आलेसा निळे**

साथी किशोर पवार **'श्रमिक कार्यकर्ता रत्न पुरस्कार' : मा.तात्यासाहेब काळे**

यांना प्रदान करण्यात येणार आहे. आपण सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

| | | |
|---|---|---|
| **श्री.किरण ठाकूर** | **श्री.अंकुश काकडे** | **श्रीमती वंदना पवार** |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

# राष्ट्र सेवादल

## सलाम सावित्रीच्या लेकींना...

दि. ३ जानेवारी... सावित्रीबाई फुले यांची जयंती, स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने महत्त्वाचा दिवस.

या दिवशी **सावित्रीबाई** यांच्यासोबतच **राजमाता जिजाऊ, फातिमा शेख, रमाबाई रानडे, अहल्याबाई होळकर** या इतिहासातील रणरागिणींच्या योगदानासोबत वर्तमानातील **मलाला**चा संघर्ष हे सर्वच आपल्यासाठी अतिशय प्रेरणादायी आहे.

कार्यक्रमात आपल्यासोबत असणार आहेत आपल्या चळवळीतील मैत्रिणी.

प्रमुख मार्गदर्शक : **राही भिडे** प्रमुख पाहुण्या : **सुहिता थत्ते**

विशेष उपस्थिती : **आबेदा इनामदार, तेजश्री वालावलकर**

एका अभूतपूर्व क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी तुम्हा सर्वांना हे खास आग्रहाचे निमंत्रण

**शुक्रवार, ३ जानेवारी २०१४ स्थळ - साने गुरुजी स्मारक, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०.**

**: कार्यक्रमाचा तपशील :**

टू व्हीलर रॅली : सकाळी ८ ते १०.

(टू व्हीलर रॅलीचा मार्ग - फुलेवाडा-भिडेवाडा-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, साने गुरुजी स्मारक)

**: मुख्य कार्यक्रम :**

◦ **'सलाम सावित्रीच्या लेकींना'**- सत्कार आणि मनोगते (सूत्रसंचालन- दीप्ती राऊत, आय.बी.एन.लोकमत)

**'..ज्योतिबाचा शोध जारी'** खास वार्तालाप (टॉक शो) (सूत्रसंचालन - आनंद पवार (सम्यक्, पुणे)

पथनाट्य - **'पहिल्या शाळेचा पहिला दिवस'**.

◦ **मलाला**च्या मुलाखतीची चित्रफीत ◦ महिलांविषयक विशेष मागण्यांची सनद सादरीकरण ◦

◦ महिला संघटन बांधणीसाठी विशेष उपक्रम- खुली चर्चा ◦

# प्रत्येक व्यक्तीच 'गृहस्वप्न' पूर्ण करण्यासाठी
# वास्तूसिध्दी कर्ज योजना



सारस्वत बँक
**वास्तू सिध्दी**
होम लोन

- ₹ ७० लाखापर्यंत कर्ज
- परतफेडीची मुदत - २०वर्ष
- रास्त व्याजदर
- फिक्स्ड किंवा फ्लोटींग व्याजदराचे पर्याय उपलब्ध

*अटी लागू

**सारस्वत बँक**

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्यल्ड बँक)

**पुणे झोन - ८/३, एरंडवणा, कर्वे रोड, नळ स्टॉप जवळ, पुणे ४११ ००४.**

Website: www.saraswatbank.com e-mail: customerservicecentre@saraswatbank.com

साधना साप्ताहिक : ४ जानेवारी २०१४
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२०१२-२०१४
Posted at Marketyard PSO, Pune / Posting Every Thursdy/Date of Publication : 26/12/2013

साहित्य पुरस्कार

# साधना ट्रस्ट आयोजित महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका)चे पुरस्कार : २०१३

समाजकार्य पुरस्कार



वैचारिक ग्रंथ पुरस्कार
डाकीण
संध्या नरे-पवार



साहित्य जीवनगौरव
कुमार केतकर



अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार
प्लॅटफॉर्म नंबर झिरो
अमिता नायडू

समाजकार्य जीवनगौरव
रयत शिक्षण संस्था



डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति पुरस्कार
विवेक सावंत



ललित ग्रंथ पुरस्कार
पडझड
अशोक पवार



कार्यकर्ता पुरस्कार-प्रबोधन
गजानन खातू



रा. शं. दातार विशेष नाट्य पुरस्कार
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री
मकरंद साठे



कार्यकर्ता पुरस्कार-सामाजिक प्रश्न
डॉ. अशोक बेलखोडे



रा. शं. दातार नाट्य पुरस्कार
राजकुमार तांगडे



कार्यकर्ता पुरस्कार-असंघटित कष्टकरी
धनाजी गुरव

## निमंत्रण

शनिवार ११ जानेवारी २०१४, सायंकाळी : ५ वाजता, स्थळ : बालगंधर्व रंगमंदिर, पुणे

कुमार केतकर, रावसाहेब शिंदे (रयतचे कार्याध्यक्ष) आणि विवेक सावंत यांची भाषणे सायंकाळच्या मुख्य कार्यक्रमात होतील.

दुपारी २ ते ४ या वेळेत उर्वरित आठ पुरस्कारविजेत्यांची मनोगते व्यक्त करणारा कार्यक्रम होईल.
हा कार्यक्रमही बालगंधर्व रंगमंदिर येथेच होईल.

समारंभाच्या ठिकाणी सर्व उपस्थितांना साधना साप्ताहिकाचा पुरस्कार विशेषांक भेट देण्यात येईल.

संपर्क - ४३१ शनिवार पेठ, पुणे ३० फोन : ०२० २४४५१७२४ email : weeklysadhana@gmail.com